# राजार्जून

- ऋषिकेश मठपती



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# राजार्जून

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

a

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

एक जगावेगळी रहस्यकथा

# राजार्जून

लेखक : ऋषिकेश मठपती

# राजार्जून

लेखक - ऋषिकेश मठपती

फोन नंबर - 7972076796

ईमेल - mathapati278@gmail.com

इनस्टाग्राम - @rushi.278

पत्ता - १७/२ कल्याण नगर भाग -१, जुळे सोलापूर, सोलापूर (413003)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

whatsapp: 9987737237

**Whatsapp वर विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव व गाव कळवा**

प्रकाशन : २६ ऑगस्ट २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

a

# मनोगत -ऋषिकेश मठपती



ई साहित्यच्या वाचकांना माझा नमस्कार. मी ऋषिकेश मठपती. ईसाहित्य प्रतिष्ठान' वर माझं पहिलं ‘तिला सावरताना’ या पुस्तकाला चांगला प्रतिसाद दिल्याबद्दल सर्वांचा मी आभारी आहे. मला रहस्यमय कथा किंवा कादंबरी खूप आवडते. म्हणून कित्येक दिवसांनी रहस्यमय कथा लिहिण्याचा विचार करत होतो. तर ही माझी पहिलीच रहस्यकथा आहे.

हि कथा आहे अर्जुन या १४ वर्षीय हुशार मुलाची, जो अनाथ आहे. त्या अनाथाला साथ मिळते एका कुत्र्याची, त्याचा नाव तो राजा म्हणून ठेवतो. त्याच्या आयुष्यात राधा येते. तिला मोठी बहीण म्हणून तो आयुष्यात जागा देतो. अचानक तिच्या बहिणीची हत्या होते. तिची हत्या कोणी केली? का केली? या प्रशांचे उत्तर तो शोधू लागतो. या प्रवासात त्याला कित्येक धक्के बसतात. यातून त्याच्यातून गुप्तहेर बाहेर येतो.

a

या पुस्तकासाठी खूप लोकांचा आधार मला मिळाला. सर्वात आधी माझ्यासारख्या नवीन लेखकांना संधी देण्यासाठी ‘ ई – साहित्य प्रतिष्ठान ‘ यांच मनःपूर्वक धन्यवाद. त्यानंतर मला लेखनासाठी वेळोवेळी स्फूर्ति व मार्गदर्शन देण्यासाठी श्री सचिन दिक्षित सर यांचेसुद्धा मनःपूर्वक धन्यवाद. माझ्या पुस्तकासाठी मुखपृष्ठ तयार करण्यासाठी कुमारी श्रुतिका कुदरी ( B.Sc Chemistry, B.Ed) यांनासुद्धा मनःपूर्वक आभार..

ऋषिकेश मठपती (M. Sc Mathematics)

फोन नंबर - 7972076796

ईमेल - mathapati278@gmail. com

अर्पणपत्रिका

हे पुस्तक माझ्या कुटुंबातील सर्व सदस्यांना, मला लिहिण्यासाठी स्फूर्ति देणाऱ्यांना व माझ्या सर्व शुभचिंतकांना अर्पण..

**कथाभाग सारांश**

हि कथा आहे अर्जुन या १४ वर्षीय हुशार मुलाची, जो अनाथ आहे. त्या अनाथाला साथ मिळते एका कुत्र्याची, त्याचा नाव तो राजा म्हणून ठेवतो. त्याच्या आयुष्यात राधा येते. तिला मोठी बहीण म्हणून तो आयुष्यात जागा देतो. अचानक तिच्या बहिणीची हत्या होते. तिची हत्या कोणी केली? का केली? या प्रशांचे उत्तर तो शोधू लागतो. या प्रवासात त्याला कित्येक धक्के बसतात. यातून त्याच्यातून गुप्तहेर बाहेर येतो.

***I can***

***And***

***I will***

# राजार्जून

ही कादंबरी काल्पनिक असून या कादंबरीतील स्थळे, व्यक्ती व घटना काल्पनिक आहेत. त्यात कोणाच्याही भावना दुखाविणे हा हेतू नाही. कोणाही स्थळ, व्यक्ती वा घटनेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नाही. तसा तो आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# राजार्जून

असं म्हणतात की शहरातील जीवन कधीही झोपत नाही. रात्रीही शहरातील जीवन सुरूच असते. अशीच एक शहर, जिथे जीवन कधीही थांबत नाही. कित्येक लोक इथे येतात. आपले स्वप्न पूर्ण करतात आणि इथलेच होऊन जातात. पण शहरातील सकाळची वेळ अगदी प्रसन्नपणे जात होती.

त्याच शहरात एक १६ वर्षांचा मुलगा ' अर्जुन ' रहात होता. त्याची कथा म्हणजे त्याची आई त्याला जन्म देताच मरण पावली. बाप असून नसल्यासारखा होता. दारू आणि जुगारामध्ये पैसे उधळत होता. त्याच शिक्षण मात्र आठवीपर्यंतच झालं होत. अश्याच एका रात्री त्याचा बाप दारू पिऊन जात होता. अचानक एका ट्रकने त्याला उडवल. त्याच

अपघातात त्याच्या बापाची मृत्यू झाली. आता या शहरात अर्जुन एकटाच आयुष्य जगत होता.

" मे जिंदगी का साथ निभाता चला "

एका टपरीवर रेडिओ वाजत होता. जिथे अर्जुन कामाला म्हणून होता. खूप कष्ट करत होता. सकाळची वेळ होती. त्याला टपरी उघडत असताना रस्त्यावर एक कुत्री मेलेली दिसली. एक लहान असं पिल्लू तिच्याभोवती गिरक्या घालत असताना त्याला दिसली. त्या पिल्लाला पाहून त्याला स्वतः वर उद्भवणारी परिस्थितीची जाणीव झाली. तो सुद्धा एकटाच होता. त्या पिल्लाला पाळायचा निर्णय तो घेतला. त्यांनी पिल्लूच नाव ' राजा ' असं ठेवला. कारणसुद्धा तसेच होते. तो जेंव्हा रखवाली करायचा त्याचे कान एकदम उभे राहायचे, जणू एक राजा आपल्या राज्याचं रक्षण करत असावा.

आता दररोजच त्यांच दिनक्रम ठरलेलं होतं. रोज सकाळी उठून ते दोघे टपरीवर जायचे. तिथे अर्जुन राजाला दूध पिऊ घालायचा. तो मात्र दुपारी एक वडा पाव खायचा आणि संध्याकाळी तिथे ते दोघेही समुद्रकिनारी कित्येक वेळ त्या लाटांना पाहत बसायचे. तिथे येणारे खूप सारे लोकांना आनंदी पाहून तोसुद्धा आनंदित व्हायचा. तिथे लहान मुलांना

खेळताना पाहून त्यालाही त्यांच्यासोबत खेळावस वाटत असे. पण 'ते मुले मला कसे वागवतील?' असा विचार करून तो कुणामध्ये मिसळत नव्हता. त्या लाटांना पाहून त्याला खूप समाधान वाटायचं. कधी कधी तर ते दोघे तिथेच झोपी जायचे आणि पुढच्या दिवशी परत पहिले पाढे पंचावन्न.

सूर्य मावळतीला आला होता. रोजच्या प्रमाणे राजा आणि अर्जुन समुद्रकिनारी बसले होते. तेवढ्यात मागून एका मुलीचा आवाज आला.

एक मुलगी -" चोर चोर " म्हणत पळत होती. तिने जीन्सची पँट, एका साइडला साईड बॅग घालून, मोकळे केस, साधारण वय २५ वाटत होती. चोर तिची पर्स घेऊन पुढे वेगाने धावत होता. त्या वाळूत तो चोर पुढे आणि ती त्याच्या मागे धावत होती. अर्जुन राजाकडे पाहत म्हणाला.

अर्जुन -" राजा.... गो "

अस म्हणताच राजा एकदा भुंकला आणि त्या चोराच्या मागे पळत सुटला. राजा अगदी वेगाने पळत होता. अर्जुनसुद्धा राजाच्या मागे धावत सुटला. राजा इतका वेगात होता की काही सेकंदात तो चोराजवळ

पोहचला आणि त्या चोराला चावा घेण्यासाठी त्याच्यावर चढला. तो भीतीनेच खाली पडला. राजा त्या पर्सला दातात पकडला होता. अर्जुन आणि ती मुलगी त्याच्याजवळ येऊन त्याला मारू लागले.

ती -" लाज नाही वाटत चोरी करायला? देवांनी तुला चांगले हातपाय दिले आहेत, त्याचा उपयोग करून काम का नाही करत?"

चोर -" माफ करा मॅडम. कोणी मला कामच देत नाही आणि या पोटासाठी मी चोरी केली मॅडम. मला माफ करा.."

तो हात जोडून म्हणाला.

ती -" ठीक आहे. आता पुढं कुठ दिसलास तर बघ... आणि हे घे माझं कार्ड, उद्या ये तुला काम मिळेल..."

चोर -" खूप उपकार झाले मॅडम..."

अस म्हणत तो चोर निघून गेला. ती अर्जुनजवळ येत म्हणाली.

ती - " थॅंक्यु... तुझं नाव?"

अर्जुन -" माझं नाव अर्जुन आणि हा राजा..... आणि हो.. तुमचं नाव राधा अगरवाल... अगरवाल कंपनीच्या मालकाची एकलुती एक मुलगी. तुम्ही त्या म्हाडा कॉलनीच्या समोरच्या बंगल्यामध्ये राहता. तुम्हाला पाहून अस वाटत कि तुम्हाला तुमच्या ऐशोआरामाची जिंदगी नकोय.."

हे पूर्ण ऐकताच राधा त्याला आश्चर्याने पाहू लागली.

राधा -" माझ्या बद्दल एवढं कसं जाणतोस?

अर्जुन -" अगदी साधं लॉजिक आहे. तुम्ही आता तुमचं कार्ड त्या चोराला दिलं. त्या कार्डवर तुमचं नाव आणि तुमच्या कंपनीच नाव होतं. मग त्या वरून कळालं की अगरवाल यांच आणि तुमचा काहीतरी संबंध आहे. तुम्ही त्या चोराला म्हणालात की त्याला काम देणार म्हणजे त्यांची मुलगीच असणार. तुमच्या जवळ खूप गाड्या असणार तरी तुम्ही चालत आलात, त्यावरून कळलं की तुम्हाला ऐशो आरामाची जिंदगी तुम्हाला नकोय. तुम्हाला स्वतःच काहीतरी करायचं आहे. मला तुमचं घर माहिती नव्हतं. पण तुमच्या जीन्स वर चुना लागला आहे. इथे फक्त म्हाडा कॉलनीच्या समोरच चुनाचा ढीग पडला आहे आणि त्याच्या समोरचा बंगल्यातच तुम्ही राहत असणार. "

राधा -" इंटरेस्टिंग.... यू आर वेरी स्मार्ट... तू काय करतोस???.."

अर्जुन -" मी इथे टपरी वर काम करतो. या टपरी वर मिळणारा मोबदल्या, यावरच राजा आणि माझा खर्च निघतो. "

राधा -" शाळेला नाही जात का?"

अर्जुन -" कसं जाणार? कोणीच नाही आहे माझं या जगात.. तरी ८ वी पर्यंत माझं शिक्षण झालाय. आता हि टपरी आणि राजा हेच माझं जग..."

राधाला त्याची खूप दया आली. असला हुशार मुलगा शाळेत जात नसल्याचे ऐकून तिला खूप वाईट वाटले.

राधा -" तू काही खालास?"

अर्जुन -" खालो ना. वडा पाव..."

राधा -" चल आपण जेऊ या.."

अर्जुन -" नको नको.... मला भूक नाहीये..."

राधा -" अरे पण मला लागली ना..."

अर्जुन -" अच्छा मग चला... जायचं का राजा?"

राजा " भाऊ " म्हणत परवानगी दिला.

तिघेही हॉटेलमध्ये गेले. राधा जेवणाची ऑर्डर दिली.

राधा -" तुला आता शाळेला जायचं झालं. तर जाशील का?"

अर्जुन -" जाईन की... पण राजा आणि माझं खाण्याच कसं होणार?"

राधा -" ह्म्म... पण एक होऊ शकत ना?. तू सकाळी आणि रात्री टपरीवर जाऊ शकतोस की..."

a

अर्जुन -" होऊ शकत... "

राधा -" तू फक्त शाळेत जा. बाकीचं नंतर बघू..तुझ एडमिशन आता झालं म्हणून समझ..."

अर्जुन -" पण तुम्ही हे सगळं माझ्यासाठी का करत आहात?"

राधा -" कारण कोणी फक्त पैसे नाही म्हणून शिक्षण सोडावं लागू नये म्हणून..."

अर्जुन -" तुम्हाला एक सांगू?"

राधा -" सांग की..."

अर्जुन -" तुम्हाला बघून मला असं वाटत की माझी मोठी बहीण असली असती तर तुमच्यासारखी असली असती."

राधा -" अरे मग मला मोठी बहिणच समझ की..."

a

अर्जुन -" हो.... थॅंक्स दीदी..."

राधा -" अरे. दिदीला कोणी थॅंक्स म्हणत का?"

अर्जुन -" ते ही आहे.."

चांगल्या शाळेत त्याच एडमिशन झालं. आता तो शाळेत जात होता. शाळेत जाताना तो टपरीवरचे सगळे काम आटपून जात होता. शाळेत गेल्यावर राजा मात्र शाळे बाहेर बसत होता. मधली सुट्टीच्या वेळी राजाला खायला देणं आणि स्वतः काहीतरी खाण. शाळा सुटल्यावर दोघे परत आपल्या टपरीवर येत असत. टपरीचे मालक त्याच्याबद्दल खूप आनंदित होते. शाळेत त्याचे नवीन मित्र मैत्रिणी झाले. त्यातली एक होती ' अंजली '. ती हुशार आणि तेवढीच मदत करणारी होती.

दर रविवारी राधा आणि हे दोघं चौपाटीवर भेटत असत. आठवड्यात आयुष्यात काय काय झालं हे एकमेकांना सांगत असत.

एका रविवारी राधा एका मुलाला घेऊन आली.

a

राधा -" अर्जुन हा माझा फ्रेंड राहुल..."

अर्जुन -" फ्रेंड???... का बॉयफ्रेंड??"

राधा लाजत म्हणाली.

राधा -" राहुल.. तुला म्हणले होते ना याच्या नजरेतून काहीही नाही चुकत ते. हाच तो अर्जुन..."

राहुल -" बरं ते जाऊ देत... तुला कसं कळलं की मी हीचा बॉयफ्रेंड आहे ते?"

अर्जुन -" सिंपल. राधा जेंव्हा तुला फ्रेंड म्हणाली तेंव्हा तिची पापणी बंद नव्हती. माणूस असं खोटं बोलताना करत असतो. दीदी ला हे पण माहिती नाही तिच्या हातांवर दोन वेळा इंग्लिश मध्ये आर आर अस टॅटू काढला आहे. अजुन एक, हिच्या मोबाईल मध्ये तुमचा दोघांचा फोटो बघितला आहे ",

राहुल -" स्मार्ट... खरंच राधा तू सांगितलं तसाच आहे हा..."

a

राधा -" मी म्हणाले होते ना.. मग कशी चाललीय तुझी शाळा?"

अर्जुन -" मस्त... "

राहुल -" मग कोणी मैत्रीण झाली का?"

अर्जुन -" हो... अंजली म्हणून आहे. ती खूप छान आहे... मला खूप काही मदत करते..."

राहुल -" मग गर्लफ्रेंड म्हण की....

राधा -" तू गप रे.... अर्जुन आज आपण बाहेरच जेऊ या... सगळे??."

अर्जुन -" ह्म... काय म्हणतो राजा जायचं का?"

परत राजा भुंकत परवानगी दिला. त्यारात्री ते सगळ्यांनी खूप मजामस्ती केली. परत पुढच्या दिवशीपासून सोमवार आला. परत तोच दिनक्रम चालू झाला.

--------------------

रविवारचा दिवस होता. अर्जुन चौपाटीवर राधाची वाट पाहत बसला होता. रात्र झाली तरी राधा आली नव्हती. अर्जुनला वाटल कुठल्यातरी कामात व्यस्त असेल. परत तोसुद्धा शाळेच्या अभ्यासात आणि कामात व्यस्त झाला.

असाच तो शाळेतून परत येत होता. संध्याकाळ होतं आली होती. रस्त्यावर खूप गर्दी जमली होती. पोलिससुद्धा आले होते. अर्जुनला नवल वाटलं. कारण त्या रस्त्यावर वर गर्दी नसायची. तो तिथे जाऊन पाहतो, तर काय.. राधा तिथं मृत पडली होती. अर्जुनला खूप मोठा धक्का बसला. तो गर्दीतून मार्ग काढत आत जात होता. तेवढ्यात त्याला कॉंस्टेबलने त्याला थांबवल. तो खूप विनवणी करत होता. राधाच्या डोक्याला खूप मार लागला होता. रस्त्यावर रक्त पसरलेल होतं. तिच्या पर्समधील सामान इतरत्र पसरलेल होते. अर्जुन मात्र रडकुंडीला आला होता. कोणी एकटी त्याच्या आयुष्यात आली होती आणि एक झटक्यात गेली. ती म्हणजे त्याची मानलेली बहीण होती. तिला असं पाहून अर्जुन रडत होता. राजा तिच्या मृत शरीराला पाहून तिथेच बसला.यात काहीही शंका नव्हती की राधाचं खून झाला होता. राजा आणि अर्जुन परत एकदा अनाथ झाले होते. पोलिसानी पूर्ण रस्ता बंद केला. अर्जुन मात्र तिच्या मृत शरीराकडे पाहत होता.

a

संध्याकाळ होतं आली होती. सूर्य समुद्राच्या पोटात जाऊ पाहत होता. बीचवर सगळे खूप आनंदात होते. अर्जुन आणि राजा अजुनही दुःखात होते. त्या घटनेला ३ दिवस होऊन गेले होते. अजुन ते दोघे त्याच दुःखात होते. आपला काहीही संबंध नसतानाही ती खूप काही करत होती. मात्र अचानक तिचा मृत शरीर नजरेसमोर येत असेल, असा अर्जुनने स्वप्नातही विचार केला नव्हता. राजाने तीन दिवस झाले काहीही खाल्ले नव्हते. खरंच म्हणतात सगळे, कोणीही मेल्यावर सगळयात जास्त दुःख त्यांच्या खूपच जवळ असलेले लोकांना आणि कुत्र्याला होतं असतं.

अर्जुनला भूक आणि तहान काहीच लागत नव्हती. आपल्याला नवी आयुष्य देणारी राधा आज या जगात नव्हती. अर्जुन शून्यात पाहत विचार करू लागला.

' राधाचं म्हणत होती की, आपण शाळा शिकावी आणि मोठ व्हावं. नाही नाही..... शाळेला जायचं आणि मोठ होऊन दाखवायचं.' एवढं विचार करून तो उठला. राजाला कसं तर करून काहीतरी खाऊ घातला. पण रात्री त्याला झोपच लागली नाही.

दुसऱ्या दिवशी पासून तो शाळेला जाऊ लागला. तिथेही त्याच मन लागत नव्हतं. अंजली हे ओळखून होती. मधल्या सुट्टीत तिने त्याला कारण विचारली. त्याने सगळं काही सांगितला.

अंजली -" जे झालं ते खूप वाईट झालं. पण आता आपण काय करू शकतो. जे झालं ते विसरून जा... आणि पुढचं बघ.."

अर्जुन -" ह्म्म्.."

शाळा सुटल्यानंतर अंजली, अर्जुन आणि राजा चालत त्याच रस्त्यावर जात होते. अर्जुनला परत त्याच दिवसाची आठवण येत होती. तो रस्ता अजुनही बंद होता. तिथे काही हवालदार होते. अचानक एक पोलिसाची गाडी आली आणि थांबली. त्यातून इन्स्पेक्टर पाटील बाहेर आले.

पाटील -" काय रे चव्हाण काही कळाले का?"

चव्हाण -" नाही साहेब.बॉडी पी.म ला पाठवली आहे. रिपोर्ट आल्यावर कळेल. "

अर्जुन आणि अंजली त्यांचं बोलणं ऐकत होते.

पाटील -" मला तर वाटतं की कोणीतरी बदला घेण्यासाठी खून केला असावा. "

चव्हाण -" शक्यता नाकारता येत नाही सर..."

पाटील -" चला आता रिपोर्ट आल्यावर कळेलच..."

चव्हाण -" सर आपण अगरवाल यांची चौकशी करायची का?"

पाटील -" चव्हाण त्यांचं चौकशी करायला खूप मोठा पुरावा पाहिजे."

चव्हाण -" पण सर कुठून तरी सुरुवात करावीच लागणार ना.."

तेवढ्यात अर्जुन पुढे होऊन म्हणाला

अर्जुन -" सर तुम्ही राहुलची चौकशी करा.."

पाटील त्याला पाहिले आणि म्हणाले.

पाटील -" तू कोण?"

अर्जुन -" राधा माझी बहीण होती."

चव्हाण -" काहीही काय बोलतोस?"

अर्जुन -" हो सर. ती मला भाऊ मानत होती. मी एक अनाथ आहे, तिने माझ्यासाठी खूप काही केलंय सर..."

चव्हाण -" एवढ्या मोठ्या बिझनेस मेन ची पोरगी तुला भाऊ मानते??"

चव्हाणला विश्वास बसत नव्हता. त्याच्या मनात कसलीतरी शंका येत होती. अर्जुन त्यांना खूप समजावून सांगू लागला.

a

अर्जुन -" सर प्लीज... विश्वास ठेवा माझ्यावर... "

चव्हाण -" ए.... गप जातो का मारू एक."

पाटील -" चव्हाण... थंड घ्या जरा. काय बोलायचं आहे सांग?"

अर्जुन -" सर तीने माझ्यासाठी खूप काही केले. ती खूप चांगली होती. तिला प्रॉपर्टीच काहीही पडलं नव्हतं. तिला याची काहीही गरज नव्हती, तिचा बॉयफ्रेंड राहुल मला एकदा भेटला होता... "

पाटील -" म्हणजे तुला राहुलवर शंका आहे?"

अर्जुन -" नाही सर... पण मला म्हणायचं आहे की त्याला काहीतरी माहिती असेल "

पाटील -" मग तुला माहिती का तो कुठे राहतो?"

अर्जुन -" नाही सर... पण जर राधाच्या कॉलेजमध्ये चौकशी केली तर कळेल..."

पाटील -" चव्हाण चला गाडी काढा.. आणि तू पण चल."

अर्जुन -" ओके सर चला.... अंजली तू घरी जा मी यांच्या सोबत जातो.. बाय."

अंजली -" बाय... काळजी घे..."

अर्जुन -" तू पण.. चल राजा..."

राजा " भाऊ " म्हणत होकार दिला..

चव्हाण -" हे कुत्रा पण येईल का?"

अर्जुन -" हो सर... हा माझा साथी आहे..."

पाटील -" चल घे त्याला पण... चला चव्हाण..."

a

चव्हाणानी गाडी चालू केली. काहीवेळाने गाडी कॉलेजजवळ येऊन थांबली. कॉलेज खूप मोठं होतं. अर्जुन तर कॉलेजची इमारत पाहण्यात हरवून गेला होता. सगळी मुले आणि मुली पोलिसांना पाहत होते.

पाटील -" चव्हाण चला प्रिन्सिपल कडे... "

चव्हाण एका शिपाई जवळ गेला.

चव्हाण -" प्रिन्सिपलच केबिन कुठे आहे?"

शिपाई -" तिथे आहे साहेब... चला सोडतो..."

पाटील आणि चव्हाण प्रिन्सिपलच्या केबिनमध्ये गेले. अर्जुन आणि राजा बाहेरच थांबले. पोलिसांना पाहताच प्रिन्सिपल उठून उभा राहिले.

प्रिन्सिपल -" नमस्कार साहेब... बसा बसा... काय झालं?"

a

पाटील -" नमस्कार.. तुमच्या कॉलेजमध्ये राधा अगरवाल शिकत होती का?"

प्रिन्सिपल -" हो सर... अगरवाल यांची पोरगी... ते आमच्या कॉलेजचे ट्रस्टी आहेत..."

पाटील -" बरं बरं... तिचा ३ दिवसापूर्वी खून झाला आहे..."

प्रिन्सिपल - " कळाले सर मला... खूप वाईट झालं तिच्यासोबत...सांगा तुमची काय मदत करू शकतो?"

पाटील -" सर... राधा कुठल्या क्लासमध्ये शिकत होती?"

प्रिन्सिपल -" ती बी. ए च्या तिसऱ्या वर्षात होती. "

पाटील -" बरं... तीच काही तक्रार वगैरे.."

प्रिन्सिपल -" नाही सर... ती खूप चांगली मुलगी होती. "

a

पाटील -" सर... मी तिच्या क्लासमध्ये चौकशी करणार आहे. तुम्हाला अजुन काही कळाले तर सांगा..."

प्रिन्सिपल - " ओके सर... नक्की सांगतो."

पाटील आणि चव्हाण दोघेही बाहेर आले. अर्जुन आणि राजा त्यांचे वाट पाहत होते.

अर्जुन -" सर अजुन काही कळाले का?"

चव्हाण -" तुला कशाला पाहिजेत नसत्या चौकश्या?"

पाटील -" चव्हाण.शांत व्हा... काही कळलं नाही."

अर्जुन कॅन्टीनकडे बोट दाखवत म्हणाला.

अर्जुन -" सर ती बघा राधाची मैत्रीण..."

चव्हाण -" तुला कसं माहिती की तिचीच ती मैत्रीण आहे ते?"

अर्जुन -" सर... राधा आणि तीचा फोटो मी राधाच्या मोबाईल मध्ये बघितला होता."

पाटील -" चला चव्हाण.... "

सगळे कॅन्टीनमध्ये गेले. तिथे खूप सारे मुलमुली होते. तिथे राधाची मैत्रीण आणि त्यांचा ग्रुप गप्पामस्ती करत होते. सगळे पोलिसांना पाहताच शांत बसले. पाटील त्यांच्या टेबलापुढे येऊन थांबले. ते थांबताच सगळे उठून उभा राहिले.

पाटील -" अरे उठलात का?... बसा बसा..."

सगळे एकमेकांना पाहत होते. नंतर सगळे बसले.

पाटील -" तू राधाची मैत्रीण ना?"

स्नेहा -" हो सर.... माझं नाव स्नेहा पवार."

a

पाटील -" तर स्नेहा... मी असं ऐकलंय की राधाला एक बॉयफ्रेंड होता."

स्नेहा -" नाही सर..."

अर्जुन -" नाही सर. ही खोटं बोलत आहे. हिला मी फोटोत पाहिलंय ते पण राहुल आणि राधासोबत..... हिच्या तोंडावरून कळतंय की ही खोटं बोलत आहे."

पाटील -" स्नेहा खरं खरं सांग..."

स्नेहा -" सॉरी सर... तिला एक बॉयफ्रेंड होता. राहुल त्याचं नाव."

चव्हाण -" मग पहिला खोटं का बोललीस?"

स्नेहा -" असं राहुलच म्हणाला की कुणाला सांगू नको म्हणून "

पाटील -" बरं त्याचा नंबर आहे का?"

a

स्नेहा -" हो सर..."

पाटील -" चव्हाण हीच्याकडून नंबर घ्या आणि ट्रेस करा."

चव्हाण -" हो सर..."

पाटील -" अर्जुन, राहुल कसा होता?"

अर्जुन -" म्हणजे सर तो चांगला होता. मग माहिती नाही कि तो स्नेहाला असं का म्हणाला ते..."

पाटील -" त्याचा राधाच्या खूनामध्ये हात असणार."

अर्जुन -" नाही सर.... असं असलं तर तो स्नेहाला कधीच भेटला नसता."

पाटील -" बरोबर बोललास"

मोबाईलमध्ये बोलून चव्हाण आला.

चव्हाण -" सर राहुलचं मोबाईल एक बंद पडलेल्या फॅक्टरी मधलं लोकेशन दाखवत आहे."

अर्जुन -" सर त्याला काहीतरी माहिती असणार त्याला जाऊन विचारायला हवं."

पाटील -" चला चव्हाण गाडी काढा."

सगळे गाडीमध्ये बसले. एका तासात ते त्या फॅक्टरीच्या बाहेर पोहोचले. ती एक बंद पडलेली फॅक्टरी होती. सगळीकडे शांत वातावरण पसरलेल होतं. राजाला वेगळी गंध सापडली. ते हुंगत तो भोकु लागला.

अर्जुन -" राजा गो..."

राजा पळत त्या फॅक्टरीमध्ये गेला. बाकी सगळे त्याच्या मागे गेले. जसे ते आत गेले. पुढील परिस्थिती पाहताच सगळे थक्क झाले. कोणीतरी राहुलला फाशीवर वर लटकवले होते. त्याचा गळा सुद्धा चिरडला होता. त्याच्या गळ्यातून रक्त खाली पडत होता. पाटीलनी डोक्यावरची टोपी

a

काढली. त्या मृत शरीराच्या मागील भिंतीवर रक्ताने लिहिलेलं होत. " प्रलय आनेवाला है ". सगळे त्या भिंतीवरच्या वाक्याकडे पाहत होते. आता ही केस डब्बल मर्डरची झाली होती.

मृत शरीर लटकत होते. त्या मृत शरीरावर कॅमेरेचा प्रकाश पडत होता. कॅमेरामन वेगवेगळ्या कोनातून फोटो काढत होता.

पाटील -" चव्हाण... खाली घ्या बॉडीला... खूप झाले मॉडेलिंग.."

चव्हाण -" हो... साहेब."

अर्जुन मात्र त्या भिंतीवरच्या अक्षराकडे पाहत होता. त्यावर लिहिलेलं वाक्य जणू काहीतरी त्याला सांगत असावे. इन्स्पेक्टर पाटील त्याच्याजवळ आले.

पाटील -" अर्जुन.... काय झालं?"

अर्जुन -" काही नाही साहेब... हे जे काही लिहिलेलं आहे त्यावरून वाटत आहे की, काहीतरी मोठे होणार आहे. "

चव्हाण मृत शरीराला अंबुलन्समधून हॉस्पिटलला पी. एम साठी पाठवून आला.

चव्हाण -" काय म्हणायचं आहे तुला?"

अर्जुन -" म्हणजे साहेब गुन्हेगार दोन प्रकारचे असतात. पहिले जे गुपचूप गुन्हा करतात आणि दुसरे म्हणजे गुन्हा करून तुम्हाला चॅलेंज देतात.असे काहीतरी पुरावे सोडून.. जणूकाही तो तुम्हाला म्हणत असावा की ' या पकडून दाखवा मला '.. आणि हा दुसऱ्या प्रकारचा गुन्हेगार आहे."

पाटील -"बरं... प्रलय आनेवाला है... याचा अर्थ काय?"

तेवढ्यात दुसरा कॉन्स्टेबल त्यांच्याजवळ आला.

कॉन्स्टेबल -" साहेब...हे मोबाईल आणि पाकीट सापडल. "

a

पाटील -" हे तर राहुलचा वाटतोय. चव्हाण हा मोबाईल घ्या. यात काय सापडते का बघा...आणि या नंबरचे आउटगोइंग आणि इन्कमिंग कॉलचे सगळे डिटेल्स मला पाहिजेत लवकरात लवकर.."

चव्हाण -" हो साहेब.."

चव्हाण मोबाईल घेऊन गेला. पाटील पाकीट उघडून पाहू लागले. त्यात राहूलचे लायसेन्स, ए टि एम आणि त्याच्या कुटुंबाचा एक फोटो होता. अर्जुनसुद्धा त्या पकिटाकडे पाहत होता.

अर्जुन -" साहेब जायचं का?"

पाटील -" कुठं?"

अर्जुन - " राहुलच्या घरी..."

पाटील -" तुला पत्ता माहिती का?"

अर्जुन -" त्या लायसेन्स वर असेल ना..."

पाटील -" हो ना.. चल.."

पाटील, अर्जुन आणि राजा ( कुत्रा) तिघेही पोलिस गाडीमधून राहुलच्या घरी निघाले.

राहुल ' प्रकाश ' या अपार्टमेंटमध्ये राहत होता. पोलिस गाडी अपार्टमेंटच्या खाली येऊन थांबली. राहुल फ्लॅट नंबर १९ मध्ये राहत होता. पाटील अखेर बेल वाजवली. आतून ४५ वर्षाची बाई बाहेर आली.

प्रिया -" बापरे... पोलिस... काय झालं?"

पाटील -" राहुल इथंच राहतो का?"

प्रिया -" हो."

पाटील -" तुम्ही कोण?"

प्रिया - " मी प्रिया..त्याची आई... का साहेब, काय झालं?"

पाटील -" आम्ही आत येऊ शकतो का?"

प्रिया -" हो, या ना..."

घर खूप चांगलं सजवलेल होतं. अर्जुन त्या घराला नीट निरखून पाहत होता. राजा तर बाहेरच बसला होता.

पाटील -" मॅडम.... एक वाईट बातमी आहे."

प्रिया -" काय?"

पाटील -" राहुलचा खून झाला आहे."

प्रिया -" काय??"

प्रियाच्या पायाखालची जमीनच सरकली. प्रिया रडत रडत खाली बसली. तिला एक क्षणासाठी ते खरं वाटत नव्हतं.

a

पाटील -" मला माहिती आहे की खूप वाईट झालं. पण आम्हाला चौकशी करायची आहे. प्लीज कोऑपरेट करा."

प्रिया तिचे डोळे पुसत म्हणाली.

प्रिया -" विचारा काय विचारायचं आहे ते.."

पाटील - " राहुल आणि तुमच्यात शेवटच बोलणं कधी झाल होतं?"

प्रिया -" ३ दिवसा अगोदर.."

पाटील -" तो काय म्हणत होता का?... जस काही इंपॉर्टन्ट.."

प्रिया -" नाही... तो तसा काही नाही बोलला."

अर्जुन -" तुम्हाला राधा माहिती का?"

प्रिया -" तू कोण?"

a

अर्जुन -" मी अर्जुन..."

पाटील -" तो माझ्यासोबत आहे... सांगा तुम्ही राधा अगरवालला ओळखता का?"

प्रिया -" हो... ती राहुलची मैत्रीण होती."

पाटील -" तिचा सुद्धा खून झाला आहे."

प्रिया -" काय??"

पाटील -" हो... तुम्हाला अजुन कोणावर संशय आहे का?"

प्रिया -" नाही साहेब... तो खूप चांगला होता. त्याची दुसऱ्या कुणासोबत वैरी नव्हती. "

पाटील -" ओके... तुम्हाला काही कळलं तर सांगा.."

प्रिया -" हो..."

पाटील आणि अर्जुन तिथून निघाले. पोलिस स्टेशन पोहचताच चव्हाण त्यांची वाट पाहत होता.

पाटील -" काय झालं चव्हाण?"

चव्हाण -" साहेब राहुलचा कॉल डिटेल्स आले आहे... हे बघा"

पाटील -" ओह.... म्हणजे राहुलच्या मोबाईल वर ५ दिवसात एकही कॉल नाही आला??"

अर्जुन -" असं कसं शक्य आहे?"

चव्हाण -" म्हणजे?"

अर्जुन -" म्हणजे साहेब त्याची आई तर म्हणाली की त्यांचा आणि राहुल मध्ये ३ दिवसापूर्वी बोलण झालं होतं. "

a

पाटील - " म्हणजे काही तरी घोळ आहे?"

अर्जुन -" सर हे रिपोर्ट खोटा असेल तर?"

चव्हाण -" ती आई खोट बोलत असेल तर..."

पाटील -" नाही चव्हाण.... काहीतरी घोळ आहे. "

अर्जुन -" साहेब... कोणी कंपनीचा माणूस बाहेर इन्फॉर्मेशन देत असेल तर..."

पाटील -" शक्यता नाकारता येत नाही.... चव्हाण एक काम कर. एका हॅकरला बोलावून सर्वर हॅक करून खरा रिपोर्ट काढा आणि कंपनीमध्ये नेमके कोण आपल्याला रिपोर्ट देत, ह्याचा तपास करा... "

चव्हाण -" ओके सर..."

चव्हाण कडक सल्यूट मारून निघून गेला. तासाभरानंतर चव्हाण एका हॅकर सोबत आला.

चव्हाण -" साहेब.. हा संतोष... हॅकर आहे."

संतोष -" हॅलो सर..."

पाटील -" बरं... संतोष एका नंबर वरचे इन्कमींग आणि आउटगोइंग बदलता येतात का?... म्हणजे डिलिट करू शकतो का?"

संतोष -" हा सर... जर कंपनीने साथ दिली तर नक्कीच होऊ शकते."

पाटील - " मग आपण ते परत मिळवता येतात का?"

संतोष -" हो सर.. पण कंपनीला कळू शकतं... ट्राय करतो सर.."

पाटील -" ट्राय कर"

संतोष लॅपटॉप काढला आणि कामाला लागला. संगळयांच लक्ष त्याच्यावर होते. संतोष त्याच्या लॅपटॉपमध्ये हॅक करत होता. तेवढ्यात संतोष ओरडलाच.

a

संतोष -" येस... आय डीड इट"

कित्येक प्रयत्नांनी त्या कंपनीचा सर्वर हॅक झाला होता.

संतोष -" सर त्या नंबर वर ३ दिवसापूर्वी आलेल्या कॉलची हे लिस्ट बघा."

अर्जुन आणि पाटील दोघंही त्या लॅपटॉपवर पाहत होते.

अर्जुन -" साहेब हे बघा... त्याची आईचा कॉलनंतर मात्र एकाच नंबर वर ४ वेळा कॉल आला होता. म्हणजे राहुल तिथे कुणाला तर भेटायला गेला होता. कोण असेल बरं??...एक काम कर त्या नंबरला आपण ट्रेस करू शकतो का?"

संतोष -" हो..."

अर्जुन -" डू इट.."

a

संतोष अर्जुनसारख्या लहानापासून ऑर्डर मिळाल्याने एकदमच पाटील कडे पाहत होता.

पाटील -" डू इट संतोष.."

संतोष मग त्या नंबरला ट्रेस करू लागला.

संतोष -" हे बघा साहेब... तो आता शिवाजी चौकात आहे. "

अचानक अर्जुन म्हणाला.

अर्जुन -" साहेब आपल्याला जावं लागेल. "

पाटील -" येस... चव्हाण चला गाडी काढा."

पाटील, संतोष, अर्जुन,चव्हाण आणि राजा गाडीमध्ये बसून शिवाजी चौकाकडे निघाले. संतोष लॅपटॉपच्या स्क्रीनवरून ट्रेस करत होता.

a

पाटील -" संतोष तो कुठं आहे आता?"

संतोष -" सर १०० मीटर वर आहे."

संतोष अचानक एका कडे बोट करत म्हणाला.

संतोष -" सर तो बघा तोच असेल."

वडापावच्या गाडा वर एक दाढीवाला माणूस वडापाव खात होता.

पाटील -" चव्हाण आपल्याला शांतपणे त्याच्याजवळ जाऊन पकडावे लागेल."

चव्हाण -" हो साहेब."

पाटील -" तू इथेच थांब अर्जुन..."

अर्जुन - " नाही सर.. मी पण येणार आहे. "

a

पाटील -" नको ते खूप रिस्की आहे."

पाटील आणि चव्हाण त्याच्याजवळ जाऊ लागले. त्याला त्यांची चाहूल लागली. तो त्यांना पाहताच पळत सुटला. तो अर्जुन बसलेल्या गाडीच्या दिशेने पळत सुटला. ते पाहताच पाटील आणि चव्हाण त्याच्या पाठलाग करू लागले. हे पाहताच अर्जुन राजाला म्हणाला.

अर्जुन -" राजा गो..."

राजा भुंकून त्याच्या पाठीमागे पळू लागला. अर्जुनसुद्धा त्याच्या मागे पळत गेला. तो एका बोगद्यात शिरला. बोगद्याच्या दुसऱ्या टोकाला येताच राजाने अगदी वेगात त्याच्यावर उडी मारली. राजाच्या वजनाने तो खाली कोसळला. अर्जुनने लगेचच त्याच्यावर उडी मारली.

अर्जुन -" सांग का मारलास? राहुलला आणि राधाला??.."

अर्जुन त्याच्या छातीवर बसून त्याला विचारात होता. पाटील, चव्हाण आणि संतोष त्याच्या मागे आले होते. चव्हाण त्याला थांबवायला

a

गेला पण पाटील त्याला इशारेने त्याला नकारार्थी दर्शवले. तो अर्जुनला ढकलून उभा राहिला आणि हसू लागला.

तो -" काही नाही करू शकत तुम्ही मला. प्रलय आने वाला है..."

तेवढ्यात त्याच्या डोक्यात गोळी लागली. तो खाली कोसळला. पाटील आणि सगळे त्याच्याजवळ आले. पाटील त्यांच्या डोक्यावर असलेली टोपी काढले. तेवढ्यात त्या माणसाच्या खिशातून मोबाईल वाजू लागला. अर्जुन त्याच्या खिशातून मोबाईल काढला. तो कॉल रिसिव्ह केला. पलीकडून आवाज आला.

आवाज -" अर्जुन.... बहुत अच्छा नाम है... लेकीन तू ना इन सब मे मत पड... तू अभी बहुत छोटा है... मै नही चाहता की तेरा भी इसके जैसा हाल हो... पिछा छोड दे... वर ना सब मरेंगे... "

अर्जुन -" तू कोण है??.."

तो हसू लागला.

a

आवाज -" तू जान के क्या करेगा??.. "

अर्जुन -" तेरा प्लॅन क्या है?"

आवाज -" प्रलय आने वाला है."

तेवढ्यात कॉल डिस्कनेक्ट झाला. अर्जुन शॉकमध्ये होता. कोण असेल हा?????....पाटील आणि सगळे त्या मृत शरीराकडे पाहत होते.....

संध्याकाळची वेळ होती. रस्त्यावरची वर्दळ सुद्धा कमी होतं होती. अर्जुन, संतोष,पाटील आणि चव्हाण मात्र अगदी शांत होते. एकच पुरावा त्यांना भेटल होता, त्याला पण ते गमावून बसले होते. मृत शरीर पी एम ला पाठवून सगळे पोलिस स्टेशनला आले आणि विचार करू लागले की नक्की प्रलय म्हणजे काय घडणार आहे?

चव्हाण -" साहेब जितकं आपण खोलात जात आहोतं, तितकेच ही केस फसत जात आहे."

पाटील मात्र शांत होते.

a

अर्जुन -" साहेब... आपण काहीतरी विसरतोय."

पाटील -" तुला असं का वाटतं?"

अर्जुन -" साहेब... समजा प्रलय म्हणजे काहीतरी वेगळाच प्लॅन आहे. मग राधाला कोण आणि का मारेल?"

पाटील -" राधा आणि प्रलय यात काहीतरी संबंध नक्की आहे."

चव्हाण -" मग राहुलला का मारलं असेल?"

अर्जुन -" तेच तर मला समजत नाहीये."

पाटील -" अर्जुन... मला वाटत आता अगरवाल यांना भेटायची वेळ आली आहे."

अर्जुन - " हो साहेब."

चव्हाण -" साहेब आता गाडी काढतो."

पोलिस गाडीमध्ये सगळे बसले. काही मिनिटात "अगरवाल" बंगलाच्या बाहेर गाडी थांबली. बंगलाच्या समोर खूप सारे गाडी उभे होते. पाटील आणि चव्हाण आत गेले. राजा, संतोष आणि अर्जुन गाडीतच बसले होते. बंगला खूप आलिशान आणि सुंदर दिसत होती. अनेक नोकर काम करत होते. त्यातला एकजण पाटीलाला पाहून त्यांच्याजवळ येऊन त्याने विचारले.

तो -" नमस्कार साहेब.... कुणाला भेटायचं होतं?"

पाटील -" नमस्कार... अगरवाल आहेत काय?"

तो -" आहेत की.... तुम्ही बसा मी लवकरच त्यांना बोलवून घेतो."

पाटील आणि चव्हाण सोफ्यावर बसून घेतले. चव्हाण त्यांच्या बंगला निरखून पाहत होते. त्याना नवल वाटत होतं की इतकं मोठ घर सुद्धा असू शकतं. तेवढ्यात राधाचे वडील येताना दिसले.

पाटील -" नमस्कार..."

रमेश -" नमस्कार साहेब. मी रमेश अगरवाल. राधा माझीच मुलगी होती."

त्यांचा आवाज रडण्यासारखा वाटत होता.

पाटील -" मला माहिती आहे की तुम्ही अजून दुःखात आहात. पण काय करणार साहेब आम्हाला ड्यूटी करावीच लागते."

रमेश -" ह्मम्म.... मी समजू शकतो. बोला साहेब काय विचारायचं आहे तुम्हाला?"

पाटील -" जेंव्हा राधाच खून झालं, तेंव्हा तुम्ही कुठे होता?"

रमेश -" मी तेंव्हा मीटिंग मध्ये होतो."

पाटील -" म्हणजे रात्री तुमची मीटिंग होती तर?"

रमेश -" तुम्हाला काय म्हणायचं आहे?... "

पाटील - " मला म्हणायचं आहे की रात्री मीटिंग असते हे तर मला पटत नाही "

रमेश -" म्हणजे तुम्हाला म्हणायचं आहे की मी राधाच खून केलाय? साहेब मी तिचा बाप आहे. का मारीन मी तिला?"

पाटील -" मला चुकीचा समजू नका. जो पर्यंत राधाचा गुन्हेगार मिळत नाही. तो पर्यंत माझी सुई सगळीकडे जाईल."

तिकडे बाहेर अर्जुन अजुन गाडीतच होता.

संतोष -" काय बंगला आहे यार..काय गाड्या आहेत. "

त्याच्या बोलण्याचा अर्जुन वर काहीच परिणाम होतं नव्हता. तो मात्र विचार करत होता.त्याला अचानक काहीतरी सुचलं आणि न राहून तो बंगलाच्या आत जाऊ लागला. त्याच्या मागे संतोषसुद्धा त्याला हाक मारत जाऊ लागला. तो आत जाताच रमेशच्या समोर बसला.

a

अर्जुन -" नमस्कार साहेब.... मी अर्जुन "

सगळे चकित होऊन त्याच्याकडे पाहत होते.

रमेश -" हा कोण?"

पाटील -" हा अर्जुन..."

अर्जुन -" मला फक्त एकच विचारायचं आहे "

रमेश -" काय?"

अर्जुन -" राधा कोणत्या रूममध्ये राहत होती?"

रमेश -" का?"

पाटील - " साहेब... फक्त सांगा कुठली रूम आहे?"

रमेहा -" वरून डावीकडची रूम "

अर्जुन -" धन्यवाद..."

एवढेच बोलून तो वर जाऊ लागला. त्याच्या मागोमाग सगळे वर जाऊ लागले.

रूम उघडून सगळे आत गेले.

अर्जुन -" साहेब... जर राधाला अगोदरपासून काहीतरी त्रास असेल तर नक्की इथे काहीतरी सापडेल. आपल्याला सगळीकडे चेक करावं लागेल. "

पाटील -" करेक्ट..."

चव्हाण, संतोष, पाटील आणि अर्जुन रूम चेक करू लागले.

संतोष -" सर... कॅन वी चेक द कॉम्प्युटर?"

पाटील -" येस.... "

संतोष कॉम्प्युटर चेक करू लागला. पीसी ऑन करताच त्याला पासवर्ड मागू लागला.

पाटील -" याला तर पासवर्ड लागेल. "

संतोष -" सर हॅक करू?"

पाटील -" ओके कर..."

संतोष हॅक करू लागला.

संतोष -" सर.... इट्स रेडी..."

पाटील -" चेक कर.... काहीतरी वेगळे वाटलं तर मला पटकन सांग..."

संतोष -" ओके सर..."

a

संतोष एक न एक फोल्डर चेक करू लागला. अर्जुन रूम मध्ये आणखी काहीतरी सापडेल या आशेने रूम चेक करत होता. तेवढ्यात त्याला कॅमेरा आणि एक डायरी सापडली.

अर्जुन -" साहेब हे सुध्दा चेक करावं लागेल. "

पाटील -" येस... संतोष हे पीसीला कनेक्ट कर... "

संतोष कॅमेरा कनेक्ट करून चेक करू लागतो. त्यात राधाचे खूप सारे फोटो होते. ती जेंव्हा युरोप टूरला गेली होती त्याची आठवण त्या कॅमेरामध्ये कैद होती. त्या टूरचे प्रत्येक क्षण तिने त्या कॅमेरामध्ये कैद केली होती. तेवढ्यात अर्जुनला काहीतरी दिसले.

अर्जुन -" दादा... मागचा फोटो दाखव."

संतोष मागचा फोटो स्क्रीन वर आणला.

अर्जुन -" साहेब ते बघा... "

त्या फोटोमध्ये राधा समुद्राच्या समोर उभी होती. त्या फोटोमध्ये राधाच्या मागे एक माणूस तिला पाहत होता. पण तो थोडा दूर होता.

पाटील -" संतोष झूम कर...."

संतोष फोटोला झूम करू लागला.

संतोष -" सर.... हा तर तो माणूस आहे, ज्याला आपण पाठलाग करत होतो आणि त्याला कोणीतरी गोळी मारली. "

अर्जुन -" साहेब... काहीतरी लिंक आहे."

इतक्यात रमेश अगरवाल राधाच्या रूममध्ये येतात, तेंव्हा हे तिघे खूप गडबडीत रूम चेक करत होते. रूम अस्ताव्यस्त पाहून त्यांचा पारा चढला.

रमेश -" साहेब... हे काय चालय?. तुम्ही चौकशी अशी करत असता का?... थांबा मी कमिशनरलाच फोन लावतो."

a

पाटील -" साहेब..."

पाटील काहीतरी म्हणण्याच्या आधीच रमेश फोन लावला होता.

रमेश -" हॅलो... कमिशनर साहेब... तुमचे पाटील साहेब विनाकारण आमच्या घरी चौकशी करायला आले आहेत.."

कमिशनर -" त्यांना फोन द्या."

एवढे बोलून रमेशनी मोबाईल पाटील यांना दिला.

पाटील -" जय हिंद सर... "

कमिशनर -" काय चाललंय पाटील?"

पाटील -" सर... राधाच्या खुनाबद्दल चौकशी करायला आलो होतो."

कमिशनर -" परवानगी आहे तशी..."

पाटील -" नाही साहेब..."

कमिशनर -" मग तिथून लवकरात लवकर निघा.... आणि तुम्ही ही केस सोडा. दुसरे कोणीतरी बघेल."

पाटील -" येस सर... जय हिंद सर.."

पाटील परत फोन रमेश यांना दिला.

पाटील -" सॉरी सर... चला रे..."

अर्जुन -" काय झालं साहेब? "

पाटील -" तुम्ही पहिला येथून चला..."

अर्जुनने सगळ्यांच्या नजरा चुकवून कॅमेराची मेमरी कार्ड आणि डायरी घेतला. सगळे आता बाहेर आले.

a

अर्जुन -" काय झालं साहेब?"

पाटील -" आता मी हे केस नाही घेऊ शकत..."

संतोष -" का?"

पाटील -" वरून ऑर्डर आलीय..."

अर्जुन -" साहेब असं कसं होईल?"

चव्हाण -" असंच असत पोलिस डिपार्टमेंटमध्ये..."

पाटील - " सॉरी अर्जुन...."

अर्जुन आता खूप उदास झाला होता. सगळे गाडीत बसले. अर्जुन आणि संतोष यांना परत त्यांच्या जागेवर सोडण्यात आले.

पाटील -" सॉरी अर्जुन..."

a

एवढे बोलून ते गाडीत बसून गेले. संतोष, राजा आणि अर्जुन मात्र तिथेच उभे होते.

संतोष -" चला आता मी पण जातो. अर्जुन लगा झालं ते विसर."

अर्जुन अजुन गप्पच होता. संतोष निघून गेला. अर्जुनला आता कुणाकडून अपेक्षा उरली नव्हती. तो आणि राजा आता पुन्हा एकदा समुद्राच्या किनारी बसले होते. अर्जुन आता विचार करू लागला.

अर्जुन - ' का?... का मी काहीही करू शकत नाही?.. म्हणजे राधाला न्याय नाही मिळणार? नाही अर्जुन तू हार मानून कसं चालेल.... तू महाभारतातल्या त्या अर्जुना सारखा आहेस.... हार न मानणारा... '

तेवढ्यात त्याला डायरीची आठवण आली... तो डायरी काढून वाचू लागला.

**१५ जुन २०१९ -**

आज मी खूप खुश आहे... कारणचं तस आहे.. मी, राहुल, अंजली आणि सुप्रिया युरोप टुरला जाणार आहोत... खूप मज्जा येणार आहे... आय एम वेरी एक्सायटेड..

**२० जुन २०१९ -**

आज सकाळीच विमान इटलीच्या एअरपोर्टवर पोहचलं... खूपच मस्त आहे इटली,आपल्या देशासारखा तर नाहीये. इथे खूप नीटनेटके आहे... आम्ही आज खूप थकलो... ट्रॅव्हलमधेच खूप वैतागलो... सो गूड नाईट... उद्या आम्ही फिरायला जाणार.. बट आय मिस अर्जुन अँड राजा... गूड नाईट..

a

## २२ जुन २०१९ -

सकाळ खूपच मस्त होती. सकाळी उठताच बाल्कनीमध्ये उभी राहून कॉफी पिणे मला खूप आवडलं... कालच्या प्रवासाने सगळे खूपच थकले होते. त्यामुळे सगळे उशिरापर्यंत झोपले होते. सकाळी मूड फ्रेश झालेला होता... सगळे तयार झाले तसे आम्ही इटलीचे पदार्थांची चव बघायला हॉटेलच्या खाली आलो.... इटलीचे पदार्थ खूपच चवीष्ट असतात. पण भारतासारख्या मसाल्यासारखी चव मात्र नव्हती. नाष्टा झाल्यावर आम्ही सगळे ' लीनिंग टॉवर ऑफ पिसा ' इथे पोहचलो... तिथे खूप लोक आले होते. कोणी त्या टॉवरसोबत फोटो काढत होते, तर कोणी तिथल्या वातावरणाचे आनंद लुटत होते. तुम्हाला माहितीच की टॉवर सोबत फोटो म्हणजे त्या टॉवरच्या वर हाथ ठेवल्यासारखे फोटो काढणे... आम्ही सुद्धा फोटो काढण्यात बिझी झालो.... पण आज काही विचित्रच घडले.. जेंव्हा सुप्रिया फोटो काढत होती.. तेंव्हा ती सारखं माझ्या मागे पाहत होती.. मी त्याला इशारानेच काय झालं असं विचारले तर ती काही नाही असं म्हणत मान हलवली... मी खरंच खूप खुशीत होते. पण सुप्रिया एकदम गप्पच झाली होती... जेंव्हा आम्ही लंच करत होतो, तेंव्हा सुप्रिया म्हणाली की, ' राधा, मी आज बघितल की तुझा कोणीतरी पाठलाग करत

a

होतं.' मी म्हणाले,' काही काय बोलतेस सुप्रिया.?..' सुप्रिया म्हणाली,' खरंच..'

तसे परत शॉपिंग करायला गेलो होतो... सुप्रिया अचानक ओरडली,' हे बघ राधा.. तो बघ.' तिच्या आवाजाने तो पळत जाऊ लागला.. तसा राहुल त्याचा पाठलाग करू लागला.. आणि आम्ही सुद्धा पळू लागलो. तो माणूस भारतातलाच वाटत होता.. तो इटलीच्या त्या गल्ली बोळातून गायब झाला... मी खूप घाबरले होते... कोण होता तो??... तो कशाला पाठलाग करत होता.... इट्स नॉट गूड नाईट फॉर मी..

**

( तेवढ्यात अर्जुनला राधाच्या कॅमेरा मधला तो फोटो आठवला... त्याला आता लिंक लागत होता.. तो परत डायरी वाचू लागला..)

**

## २३ जुन २०१९ -

परत तीच सकाळ झाली... आमच्या सोबत काल जे काही झालं ते तर मनात होतच.. पण ते विसरून आम्हाला पुढचा विचार करायचा होता... आमचं सगळं काही आटपून आम्ही ' ट्रेवी फाऊंटन ' ला निघालो... हे फाऊंटन १८ व्या शतकातल अगदी भव्य असं फाऊंटन आहे... आम्ही तिथे गेलो तर तिथलं दृश्य बघूनच दंग झालो... पण सुप्रियाची नजर मात्र इकडे तिकडे फिरकत होती.. आम्ही फोटो काढण्यात मग्न होतो, तेवढ्यात सुप्रिया ओरडली, ' राहुल, हा बघ तो कालचा माणूस जो आपला पाठलाग करत होता.' एवढेच ऐकुन पुढचं मागचा विचार न करता राहुल त्याचा पाठलाग करू लागला.. त्याचे ओरडणं बघून तिथले पोलिस पण त्याच पाठलाग करू लागले... बोळात राहुल आणि एक पोलिस ऑफिसर त्याच्या पाठलाग करत होते.. तेवढ्यात तो माणूस मागे वळून त्याच्याकडे असलेल्या बंदुकीने शूट केला.. ऑफिसर खाली कोसळला... राहुल तिथेच थांबला.. आम्ही नंतर तिथे पोहचलो.. सगळे ऑफिसर तिथे पोहचले.. खूप काही झालं.. आम्हाला पुढचं सगळ प्लॅन कॅन्सल करावे लागले. पप्पांना कॉल लावून आम्ही इथून निघालो... आम्ही परतीचा प्रवास सुरू केला... त्यांची खूप काही ओळख होती.. त्यामुळे आम्ही वाचलो.. गूड नाईट....

*****

अर्जुन पुढचं पाने चाळली तर काहीही लिहिलेल नव्हतं. ‘ म्हणजे राधा इंडियाला आल्यावर सगळं काही झालाय.. पण तेवढं तर कळाल की तीचा कोणीतरी पाठलाग करत होता’ ... अर्जुनला मात्र गरज होती एका साथीची, जो त्याला यात मदत करतील.. त्याला खूप काही शोधून काढायचं होत... तेवढ्यात त्याला संतोषची आठवण आली.. तो खूप काही मदत करू शकत होता.. तो उत्तम हॅकर होता आणि खूप काही जाणून होता. अर्जुनकडे असलेली मेमरी कार्डसुद्धा त्याच्याकडूनच बघावं लागणार होती..

अर्जुन काहीही विचार न करता संतोषच्या घरी पोहचला.. तो त्याच्या रूममध्ये बिझी होता.. जेंव्हा त्याला कळाले की अर्जुन कशासाठी आलेला आहे... अर्जुन आणि राजा दोघेही आले होते.. संतोष त्याला आत घेत म्हणाला

संतोष -" अर्जुन.. इथे कसं काय???"

अर्जुन -" तुला माहिती आहे संतोष की मी इथे का आलोय ते..."

संतोषच्या रूममध्ये खूप काही सामान इकडे तिकडे पडलेले होते. अर्जुन बसत म्हणाला.

अर्जुन - " संतोष दा... तुला पण माहिती आहे की राधाचा खून झालाय ते..."

संतोष -" हो माहिती आहे.. पण..."

अर्जुन -" पण??"

संतोष -" पण आपण काय करू शकतो??.. पोलिसांनी सुद्धा हात वर केले आहेत. आपण तरी काय करणार??."

अर्जुन -" असंच बसू पण शकत नाही ना.."

संतोष -" मग काय करायचे म्हणतोस??"

a

अर्जुन -" जेवढं काही लिंक मिळेल ते ऐकत्र करूयात आणि पोलिसांना देऊयात.. आता या डायरीच बघ ना.. हे वाचल्यावर मला कळाले की राधाचा कोणतरी इटलीहून पाठलाग करत होता..."

संतोष -" तू कुठून घेतलास ही डायरी?"

अर्जुन -" जेंव्हा पाटीलसाहेब बाहेर जात होते.. तेंव्हा सगळ्यांचं नजर चुकवून मी डायरी लपवून आणली... "

संतोष -" तू डायरी लपवून आणलास??"

अर्जुन -" आणि हे मेमरी कार्ड सुद्धा."

संतोष -" अर्जुन... हे चुकीचं आहे..."

अर्जुन -" आणि राधाचं मर्डर सुद्धा चुकीचं आहे... मदत कर ना.. "

संतोष शेवटी वैतागून तयार झाला.. अर्जुन सोबत घेवून आलेले मेमरी कार्ड तो कार्ड रीडर मध्ये घालून पीसी ला जोडला...त्या मेमरी कार्ड

मध्ये खूप सारे फोल्डर होते... संतोष त्यातली ट्रिप हे फोल्डर उघडला. त्यात युरोप ट्रीपचे सगळे फोटोज् होते. अर्जुन त्या सगळया फोटोज् ना निरखून पाहू लागला.

अर्जुन -" संतोष... हे बघ इटलीच्या प्रत्येक फोटोमध्ये तो माणूस दिसत आहे. ज्याचा खून आपल्या समोर झाला होता.."

संतोष -" हो... तो कोण असेल??"

अर्जुन -" तेच तर आपल्याला शोधायचं आहे...पण मला हे कळत नाही."

संतोष -" काय???"

अर्जुन -" जेंव्हा तो माणसाला गोळी लागली आणि त्याच्याकडे असलेल्या फोन वर कॉल आला. ते कॉल एक अज्ञात व्यक्तीचा होता आणि त्याला माहिती होतं की आपण त्याचा पाठलाग करत होतो.. कसं??"

संतोष -" त्याचे माणस सगळीकडे असतील..."

अर्जुन -" नाही संतोष... त्या माणसाचा पाठलाग करत होतो. हे फक्त आपल्यालाच माहिती होत.."

संतोष - " मग??"

अर्जुन -" एक आपल्यातला कोणीतरी त्यांना माहिती देत होता.. नाहीतर त्यांना कुठून तरी हि खबर गेलं असणार..."

संतोष पीसीच्या स्क्रीनवर पाहत म्हणाला.

संतोष -" अर्जुन... यात एक डॅड म्हणून फोल्डर आहे.."

संतोष ती फोल्डर उघडतो, तर त्या फोल्डरमध्ये कित्येक डॉक्युमेंट्स होते. प्रत्येक डॉक्युमेंट ओपन करण्यासाठी एक पासवर्ड लागत होता.

संतोष - " डॉक्युमेंट ओपन होतं नाहीये... पासवर्ड मागत आहे."

अर्जुन - " मग आता??"

संतोष - " पासवर्ड पाहिजे."

अर्जुन -" कुठून मिळेल??"

संतोष -" कुठून मिळेल म्हणजे????"

अर्जुन -" मला माहिती नाही काय पासवर्ड आहे ते??"

संतोष -" डायरीमध्ये काही नाही का??"

अर्जुन -" मला तर काही नाही सापडल.."

संतोष थोडा विचार करत होता. तेवढ्यात अर्जुन म्हणाला..

अर्जुन -" तू हॅकर आहेस ना... हॅक कर ना.."

a

संतोष -" तेवढं सोपं नाही आहे ते.. जर काही गडबड झाल तर डॉक्युमेंट क्रॅश होऊ शकत.."

अर्जुन -" म्हणजे पासवर्ड पाहिजेच तर??"

संतोष -" हो... मला वाटतं तिच्या मोबाईलमध्ये पासवर्ड सापडेल.."

अर्जुन -" कशावरून सांगतोस??"

संतोष -" खूप जण असेच करतात."

अर्जुन -" पण मोबाईल तर तिच्या घरी असेल... आपल्याला आणावं लागेल.."

संतोष -" हो..."

अर्जुन -" आज रात्रीच आणतो.."

संतोष -" कसं आणशील?"

अर्जुन -" ते काम माझ्यावर सोड..."

एवढं बोलून अर्जुन राजा सहित तिथून निघाला.

रात्रीची वेळ होती. अर्जुन आणि राजा अगरवालच्या बंगला बाहेर उभे होते. वॉचमन झोपेत होता.

अर्जुन -" राजा... तू इथेच थांब.."

राजा त्याच्या हातात आपला पंजा ठेवून होकार दिला.

अर्जुन भिंत ओलांडून आत गेला. आतील बगीचा खूप मोठा होता. अर्जुनला रूम कुठे आहे याचा थोडाफार अंदाज होताच. तो तिथे गेला. रूम तर वरच्या मजल्यावर होती. त्याला वर जावे लागणार होते. त्याला सुदैवाने तिथे एक शिडी सापडली. तो राधाच्या रूमबाहेर शिडी लावून चढू लागला. तो रूमच्या आत जाताच आतील लाईट लावला. त्यावर त्याला कळाले की राधा गेल्यापासून रूमची स्वच्छता झाली नव्हती.

एक क्षणसुद्धा वाया न घालवता मोबाईल शोधू लागला. तो खूप ठिकाणी शोधू लागला. अखेर त्याला मोबाईल तिच्याच बेडच्या लोड खाली सापडला. तो मोबाईल घेवून खाली जाणार तेवढ्यात त्याचा धक्का लागून रूम मध्ये असलेल्या पॉट खाली पडला. सगळीकडे शांत असल्याने त्या पॉटच्या आवाजाने वॉचमन जागा झाला. आतील लाईट सुद्धा लागली होती. म्हणजे आतील लोक सुद्धा जागी झाले होते. अर्जुन वेळ न घालवता शिडीनी खाली उतरला. खाली उतरताच त्याला एक सी. सी. टी. वी कॅमेरा दिसलं. त्याला बघून अर्जुनला काहीतरी खटकले. तो तिथेच न थांबता तिथली भिंत सुद्धा ओलांडली. राजा तर बाहेरचं उभा होता.

अर्जुन -" राजा चल... "

तेवढं म्हणातच राजा आणि अर्जुन पळू लागले. ते दोघं थेट संतोषच्या रूम मध्ये पोहचले.

संतोष -" अरे.. तुम्ही आलात??"

अर्जुन थोडा थकलेला होता. त्याला मोबाईल देत म्हणाला.

अर्जुन -" घे आणि ओपन कर.."

संतोष तीच मोबाईल घेऊन शोधू लागला. तिच्या ड्राईव्ह मध्ये बघू लागला.

संतोष -" येस आय गॉट इट..."

अर्जुन -" सापडला???."

संतोष -" होय..."

अर्जुन -" काय आहे पासवर्ड??"

संतोष -" पासवर्ड आहे... राजार्जुन "

अर्जुन ते पासवर्ड ऐकताच त्याला कळून चुकले की राधानी राजा आणि त्याचे नाव हेच पासवर्ड म्हणून ठेवली होती.

a

संतोषने पासवर्ड टाकून डॉक्युमेंट्स ओपन केला तर त्या डॉक्युमेंट्समध्ये अगरवालच्या फॅक्टरीचे फोटो होते आणि त्याच्या संदर्भातली डॉक्युमेंट होते. त्यानंतर एका बिल्डिंगचा सुद्धा फोटो होता.

अर्जुन -" हे काय आहे??"

संतोष त्या फोटोला झूम करतो. तर त्याला दिसते " अगरवाल केमिस्ट रिसर्च लॅब "

संतोष -". हे एक रिसर्च लॅब आहे..."

तो पुढचा फोटो पाहतो तर त्यात राधा, त्याचे वडील आणि एक महिला होती जी एका डॉक्टरच्या वेशात होती. तो एक फॅमिली फोटो वाटत होता.

अर्जुन -" ही कोण???"

संतोष -" माहिती नाही... पण एक फॅमिली फोटो वाटतोय."

a

अर्जुन - " पण ही तर डॉक्टर वाटत आहे."

संतोष -" होय.."

अर्जुन त्या फोटोकडे निरखून पाहत होता. ही महिला कोण आहे??... तो माणूस कोण होता? ज्याचा खून एक गोळी लागून झाली होता??... त्यात राधाचं काय चूक होती म्हणून त्याचा सुद्धा खून झाला होता?? आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे ' प्रलय आनेवाला है ' हे काय आहे??? असे कित्येक प्रश्न अर्जुन च्या डोक्यात चालले होते...

तो आतापर्यंत झालेल्या सगळ्या घटनेचा पुनर्विचार करू लागला.

अर्जुन मात्र एकदम शांत बसला होता. त्याला बघून न राहवून संतोष त्याला विचारला.

संतोष -" एवढं काय विचार करत आहेस, अर्जुन??"

अर्जुन -" मी विचार करत आहे की नेमक काय होतं आहे???"

संतोष -" म्हणजे काय??"

a

अर्जुन -" पहिला राधा, राहुल आणि त्यांचे मैत्रीण पॅरिसला फिरायला गेले.. तिथे कोणीतरी त्यांचा पाठलाग करत होता.. त्याचा मागे हे गेल्यावर तो गायब झाला.. बरोबर??"

संतोष -" बरोबर.."

अर्जुन -" मग ते भीतीपोटी ट्रिप कॅन्सल करून परत भारतात येतात... मग माझी आणि राधाची भेट झाली.. नंतर आम्ही मित्र झालो... मग अचानक राधाचं मृत शरीर रस्त्यावर मिळालं.."

अर्जुन एकटक पाहत म्हणाला.

संतोष -" पुढे???"

अर्जुन -" मग... आम्ही कॉलेजमध्ये चौकशी केली तर कळालं की राहुल गायब झाला होता.. मग ट्रेस करून आपण त्याला शोधले तर तो आपल्याला मृत अवस्थामध्ये सापडला. ते पण त्याची बॉडी लटकवून ठेवली होती आणि त्यामागे भिंतीवर लिहिलेलं होतं... काय होतं ते??"

a

संतोष -" प्रलय आनेवाला है.."

अर्जुन -" मग आपण त्याला लास्ट कॉल ज्याचा आला.त्याला ट्रेस केला तर तो सापडला खरा आणि आपण त्याला पाठलाग केला तर कुणाला तर त्याच्याबद्दल कळाले.. त्याचा कॉल आला ते पण त्याच्या हत्येनंतर आणि तो म्हणाला की पाठलाग करू नकोस... मला तर वाटतं तो आपल्याला बघत होता.. "

संतोष -" कसं सांगू शकतोस तू?"

अर्जुन -" सिंपल फॅक्ट आहे... त्याला खुनाबद्दल माहिती असावी.. तो साक्ष होता... त्यामुळेच त्याचा खुन झाला.."

संतोष -" कशावरून सांगू शकतोस तू??"

अर्जुन -" मी जेंव्हा अगरवालच्या बंगल्यात गेलो होतो. तिथे मला सी. सी. टी. वी कॅमेरा होता आणि रस्त्यावर सुद्धा कॅमेरा असतो.. मला वाटतं तिथूनच तो मला सांगत होता की पिछा करू नकोस... असं होऊ शकत का?, की रस्त्यावरचा कॅमेरा हॅक करून बघता येईल??"

संतोष -" हो होऊ शकत की पण त्याला खूप एक्स्पर्ट हॅकर लागतो.."

अर्जुन -" ह्मम... म्हणजे या खुनामध्ये खूप मोठे लोक आहेत.. टेलिकॉम वरून कॉल रेकॉर्डस गायब असणं, सी. सी. टी. वी हॅक करून धमकी देणं... आणि हा हे "प्रलय आनेवाला है".. याचा अर्थ काय असावा??"

संतोष -" मोठे लोक यात आहेत म्हणल्यावर काहीतरी मोठं होतं आहे.."

अर्जुन -" मला पण हेच वाटत आहे... आणि अजुन एक, त्या मेमरी कार्डमधील फोटोमध्ये ती महिला कोण आहे हे माहिती करावं लागेल.."

संतोष -" मला तर वाटतं हे एकच व्यक्ती सांगू शकते..."

अर्जुन -" कोण??"

संतोष -" राधा अगरवालचे बाबा रमेश अगरवाल.."

अर्जुन -" त्यांना आता भेटायचं कसं??"

संतोष -" म्हणजे?"

अर्जुन -" त्यांना तर पोलिस इन्स्पेक्टरसुद्धा चौकशी करत नाही, तर आपण काय चीज आहे??"

संतोष -" मग आता??"

अर्जुन -" एकच काम करू शकतो आपण??"

संतोष -" काय??"

अर्जुन -" पाटील साहेबांकडे जाऊयात.."

संतोष -" ते करतील परत केस स्टडी?"

अर्जुन -" ट्राय करू की.."

दोघेही आता सकाळ होण्याची वाट पाहत होते. सकाळ होताच ते इन्स्पेक्टर पाटीलकडे जाणार होते..

सकाळचा सूर्य बऱ्यापैकी वर आलेला होता. संतोष, अर्जुन आणि राजा ( कुत्रा ) पोलिस स्टेशनला हजर झाले. थोड्यावेळाने पाटील साहेबांची गाडी स्टेशनला आली. स्टेशनच्या समोर या तिघांना बघून पाटील आत गेले. चव्हाण तर ये तिघांना बघून म्हणाला

चव्हाण -" काय अर्जुन...परत का आलास... अरे ही केस साहेबांनी सोडली आहे..."

अर्जुन -" चव्हाण साहेब... एकदा तुम्ही एका रस्त्यावर पडला तर तिथून परत नाही जात का??... जाता ना... तसेच आम्ही परत याच रस्त्यावरून जाणार आहे... आम्हाला पाटील साहेबांना भेटू द्या.."

चव्हाण -" थांबा.... विचारून येतो.."

चव्हाण केबिनमध्ये जाऊन थोड्यावेळाने तो परत बाहेर येतो.

चव्हाण -" तुम्हाला साहेब बोलवत आहेत.."

पाटील साहेब टेबलावरील फाईल स्टडी करत होते. बाजूला चहाचा कप होता. वर न पाहताच ते म्हणाले.

अर्जुन -" साहेब... मला काहीतरी बोलायचं आहे.."

पाटील -" हा बोल.."

अर्जुन -" साहेब.. राधाचं खुन.."

त्याचा वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच पाटील म्हणाले.

पाटील -" अर्जुन... ती केस माझ्याकडे नाहीये.. त्यामुळे मला काही माहिती नाही."

अर्जुन -" साहेब... एकदा माझं एका तर ही डायरी बघा ना.. मी हे डायरी राधाच्या रूममधून चोरली होती.. यात लिहिलं आहे की पॅरिसमध्ये

a

यांना कोणीतरी पाठलाग करत होते... आणि या मेमरी कार्डमध्ये त्यांचा फोटो सापडला आणि त्या फोटोत तोच माणूस होता ज्याचा पाठलाग करताना त्याची हत्या झाली होती... आणि त्याच्या फोन वरून कॉल आला होता. तो म्हणाला की ' प्रलय आनेवाला है '.... त्यात काही तर आहे साहेब.."

पाटील ती डायरी थोडक्यात वाचतो.

पाटील -" मग?"

अर्जुन -" जेंव्हा आम्ही राधाच्या रूममधून मेमरी कार्ड चोरून घेतले होते. त्याला पासवर्ड होता.."

पाटील -" एक मिनिट तू कधी मेमरी कार्ड घेतले होतास?"

अर्जुन -" जेंव्हा तुमचा आणि अगरवाल साहेब यांच्यासोबत वाद चालू होता तेंव्हा..."

पाटील -" ओह... मग??"

अर्जुन -" त्या मेमरी कार्डमधला प्रत्येक डॉक्युमेंटला पासवर्ड होता. संतोषने सांगितले की बहुतेक लोक पासवर्ड मोबाईलमध्ये सेव्ह करून ठेवतात..'

पाटील -" मग मोबाईल कुठून मिळाला??"

पाटील टेबलावर मोबाईल पाहत आपली शंका विचारली.

अर्जुन -" रात्री मी राधाच्या घरी मोबाईल घ्यायला गेलो. तिथून मोबाईल घेतला आणि पासवर्ड घालून डॉक्युमेंट्स उघडले तर त्यात फक्त फॅमिली फोटोज् होते. राधा, तिचे बाबा आणि एक महिला होती आणि ती महिला डॉक्टरच्या वेशात होती. ती कोण आहे, ती काय करत आहे आणि ती कुठे आहे?? असे प्रश्न उद्भवला आहे साहेब.."

पाटील - " ओह... "

अर्जुन -" अजुन एक साहेब.."

a

पाटील -" काय??"

अर्जुन -" जेंव्हा मी राधाच्या घरी गेलो होतो, तिथे सी. सी. टी. वी कॅमेरा बघितला आणि मग मला आठवले की आपण जेंव्हा त्या माणसाचा पाठलाग करत होतो. तर त्याच्या मृत्यूनंतर कॉल आला आणि तो असं बोलत होता जणू तो आपल्याला बघत होता. तो रस्त्यावरच्या सी. सी. टी. वी कॅमेरामधून बघत असावा. म्हणजे साहेब कॉल रेकॉर्डमध्ये छेडछाड आणि कॅमेरामधून आपल्यावर लक्ष ठेवणे. यावरून एवढेच कळते की खूप मोठे लोक यामध्ये सामील आहेत."

पाटील - " अर्जुन... माझ्या सीनिअरकडून मला ऑर्डर्स आहेत की या केसमध्ये लक्ष न घालण्याचा.."

अर्जुन - " साहेब... जर मी तुमच्या मदतीशिवाय एवढं सगळं माहिती करून घेऊ शकतो, तर तुम्ही सोबत असाल तर काय नाही करू शकणार मी.."

संतोष -" सर... मला तर वाटतं आहे की खूप मोठं काहीतरी होणार आहे. जर मोठे लोक यामध्ये सामील असतील तर तुमचे सीनिअरसुद्धा यात असू शकतात."

थोडा वेळ शांततेत गेला. पाटील शेवटी विचार करत म्हणाला.

पाटील -" अर्जुन हे बघ मी तुला ऑफिसियली मदत करू शकत नाही... "

अर्जुन -" पण साहेब.."

मधेच पाटील हात करून म्हणाला

पाटील -" हा पण... अन्ऑफिसियली तुला मी मदत करू शकतो.. "

अर्जुनला थोडी का होईना उमेद दिसू लागली होती.

अर्जुन -" साहेब.. मग चालू करायचं??"

पाटील -" मग अर्जुन... पुढं काय करायचं??"

अर्जुन -" साहेब पहिल्यांदा आपल्याला या फोटोमध्ये जी महिला राधा सोबत आहे ती कोण आहे हे जाणून घ्यायचं आहे.."

पाटील -" मग हे फक्त एकच माणूस सांगू शकतो... "

संतोष -" कोण?"

अर्जुन -" रमेश अगरवाल..."

संतोष -" पण तो तर डायरेक्ट कमिशनरकडे जातो.."

अर्जुन -" आपल्या पोरीसाठी कोणी काहीही करू शकतो संतोष दा..."

पाटीलनी जीप काढण्याचा आदेश काढला. चव्हाण, अर्जुन, पाटील, राजा आणि संतोष सगळे अगरवाल फार्महाऊसला निघाले.

फार्महाऊस अजूनसुद्धा शांत होती. जीप फार्महाऊस बाहेर येऊन थांबली. सगळे काही फार्महाऊसमध्ये जाण्यासाठी जरासा घाबरत होते पण एकमात्र अर्जुन असा होता की न घाबरता तो आता जाऊ लागला. तो आत जाताना बघताच पाटील, चव्हाण आणि संतोष सगळे त्याच्यामागून जाऊ लागले.

आत जाताच अर्जुनाची नजर रमेश आगरवालला शोधत होती. समोरच्या मोठ्या अश्या सोफ्यावर रमेश बसलेला होता. तो काहीसा उदास दिसत होता.

अर्जुन -" रमेश अगरवाल... "

रमेश समोर बघताच अर्जुन दरवाजात उभा होता. त्याला बघताच रमेशचा पारा चढला.

रमेश -" तुझी हिम्मत कशी झाली इथे येण्याची... थांब आताच पोलिसांना फोन करतो."

a

तो फोनकडे वळत असतानाच अर्जुन म्हणाला.

अर्जुन -" काही गरज नाही... पोलीसच माझ्यासोबत आले आहेत."

अर्जुनाच्या मागे इन्स्पेक्टर पाटील आणि हवालदार चव्हाण येताच रमेशचा पारा अजुनच वर चढला.

रमेश -" इन्स्पेक्टर आत्ताच्या आत्ता बाहेर जावा नाहीतर तुमच्या कमिशनरलाच फोन जाईल.."

अर्जुन - " साहेब.. आम्हाला फक्त काही प्रश्न विचारायचा आहे. "

रमेश फोनवर नंबर डायल करत असताना अर्जुन म्हणाला.

अर्जुन -" राधा पॅरिसला का गेली???"

रमेश हा प्रश्न ऐकताच फोन कट केला आणि शांतपणे सोफ्यावर डोक्याला हात लावून बसला. तेंव्हाच पाटील आणि सगळे अर्जुनकडे पाहू लागले. कारण हे काय तरी नवीनच लिंक होती.

अर्जुन -" सांगा साहेब.. राधा पॅरिसला का गेली??"

रमेश -" ट्रिपसाठी..."

अर्जुन -" खोटं आहे हे.. खरं काय ते सांगा... "

जरा जोर लावताच रमेश अग्रवाल रडु लागले. अर्जुन त्याच्याजवळ जात म्हणाला.

अर्जुन -" सांगा साहेब... तिच्या खुनाचे कारण पॅरिसपासूनच आलेला आहे..."

त्याच्यापुढे अर्जुन आतापर्यंतचा मिळालेला लिंक सांगू लागला. राधाच्या डायरी पासून ते तिच्यापासून मिळालेल्या मेमरी कार्ड पर्यंत आणि त्या कार्डमध्ये मिळालेल्या फोटोसुद्धा त्याला दाखवला.

अर्जुन -" सांगा साहेब... राधा पॅरिसला का गेली आणि ही महिला कोण आहे???"

सगळे काही स्तब्ध होऊन दोघांकडे बघत होते. रमेश मोठा श्वास सोडत म्हणाला.

रमेश -" या फोटीमधली जी महिला आहे.. ती माझी बायको आहे... तीचे नाव ऋचा अगरवाल.. ती एक जेनेटिक सायंटिस्ट होती. आमच्या लग्नाच्या ४ वर्षानंतर राधा झाली. आम्ही दोघेही खूप खुश होतो.... राधा ५ वर्षाची असताना आम्ही सगळे पॅरिसला गेलो होतो.... हॉटेलमध्ये आम्ही राहत असताना एकदमच रात्री मला जाग आली. बघतो तर ऋचा कुठे दिसत नव्हती. खूप शोधून बघितलं पण काही उपयोग झाला नाही.. तिथल्या पोलिस स्टेशनमध्ये कंप्लेंटसुद्धा केली. पण काहीच पत्ता सापडला नाही.... मी आणि राधा तर असे समजूनच बसलो कि ती आम्हाला सोडून गेली.. त्यानंतर जेंव्हा राधा याच संडेला परत आली. तेंव्हा मला एक कॉल आला त्यात ऋचाचा आवाज आला. ती म्हणाली,' मी जिथे आहे तिथे जिवंत आहे. तुमची आठवण येत आहे. 😭 ' ती खूप रडत होती. त्यानंतर परत एक कॉल आला त्यात एक माणसाचा आवाज आला की,' ऋचा पॅरिसमध्ये आमच्या ताब्यात आहे. तुम्ही जर पोलिसांना इन्फॉर्म केलात तर राधासुद्धा गेली म्हणून समझा.' मग मी सुद्धा विचारलं,' का तिला कीडनेप केलाय?' तिथून एकच आवाज आला,'

प्रलय आनेवाला है. ' त्यामुळे राधा पॅरिसला गेली होती. म्हणून मी पोलिसांना काही सांगत नव्हतो."

अर्जुन -" म्हणजे सगळे काही तुमच्या फॅमिली सोबतच चालू झालय तर... पण हे ' प्रलय आनेवाला है ' याचा अर्थ काय आहे??"

इकडे अर्जुन काही तर्क लावत होता. तेवढ्यात पाटीलचा फोन वाजला.

पाटील -" हॅलो.... काय??... ओके आम्ही येतो.. "

अर्जुन पाटीलकडे पाहत म्हणाला.

अर्जुन -" साहेब... काय झालं??"

पाटील -" एक बॉडी सापडली आहे... "

अर्जुन -" कुणाची??"

a

पाटील -" राधा आणि राहुलची फ्रेंड स्नेहा पवार हीची... "

अर्जुन -" काय???"

पाटील -" हो.. आणि तिचा पण खुन राहुल सारखाच झाला आहे... एक मेसेज सुद्धा लिहिलेला सापडला आहे... "

संतोष -" काय??"

तेवढ्यात अर्जुन म्हणाला.

अर्जुन -" प्रलय आनेवाला है.."

पाटील -" चव्हाण..."

चव्हाण -" हो साहेब... "

चव्हाणला इशारा कळाला. वाट न पाहता त्याने बाहेर जाऊन गाडी काढली.

पाटील -" अर्जुन... आपल्याला बॉडीची तपासणी करावी लागेल..."

अर्जुन -" हो साहेब.."

इन्स्पेक्टर, चव्हाण, अर्जुन आणि संतोष सगळे त्या खुनाच्या ठिकाणावर पोहचले. एका मोठ्याशा गोडाऊनमध्ये, राहुलची बॉडी ज्या अवस्थेत सापडली होती त्याच अवस्थेत स्नेहाची बॉडीसुद्धा सापडली होती. तीच गळासुद्धा कापलेला होता आणि बॉडी मात्र फाशी लावल्यासारखी एका दोरीनी लटकवली होती. बॉडीच्या मागच्या भिंतीवर रक्ताने मोठ्या अक्षराने मेसेज लिहिलेला होता," प्रलय आनेवाला है.." त्या बॉडीला बघताच राजा भुंकू लागला. त्याच्या भुंकण्याच्या आवाज पूर्ण गोडाऊनमध्ये घुमत होता.

पाटील -" अर्जुन... आता मला ऑफिसियली काही करता येईल. ही एक दुसरी केस आहे..."

संतोष -" पण ही केस पहिल्यासारखेच आहे ना?? "

पाटील -" हो... पण तपासणी आपल्यालाच करावी लागेल ना.."

अर्जुन -" मग आपल्याला तपासणी चालू करावे लागेल साहेब..."

पाटील - " ह्मम... चव्हाण बघा काही सापडत का??"

चव्हाण -" होय साहेब..."

अर्जुन -" राजा... "

राजा शेपूट हलवत अर्जुनकडे आला. अर्जुन त्याला डेड बॉडीचा वास सुंगावला आणि म्हणाला.

अर्जुन -" राजा गो...."

राजा एकदा भुकून वास सुंघत फिरू लागला. तो जसा बाहेर सुंघत गेला, तसे त्याच्या मागे अर्जुन सुद्धा जाऊ लागला. बाकीचे मात्र त्या बॉडीच्या आजूबाजूचे वस्तू तपासात होते. राजा एकदमच बाहेर

असलेल्या झुडूपात गेला. झाड्यांमध्ये काहीवेळ राजा गायब झालेला होता. अर्जुन राजाला अजुन निरखून पाहू लागला. तेवढ्यात राजा अर्जुनला पाहत भुंकला. अर्जुन त्याला बघताच पळत त्याच्याकडे गेला. तिथे बघतो तर एक रक्ताने माखलेली चाकू पडलेला होता. अर्जुन चव्हाणला हाक मारून बोलावले. चव्हाण रुमालाने तो चाकू घेऊन इन्स्पेक्टर पाटीलकडे आला.

अर्जुन -" साहेब... याच चाकुने स्नेहाचा गळा कापला असावा. "

पाटील -" ह्मम.... चव्हाण याला लॅबमध्ये पाठवा आणि सांगा अर्जंट आहे लवकरात लवकर यावरच्या ब्लडचा रिपोर्ट हवा आहे.."

चव्हाण -" हो साहेब..."

तेवढ्यात अजुन एकदा राजा भुंकण्याचा आवाज आला. सगळे त्या आवाजाच्या मागे जाऊ लागले. बाहेर जाताच राजा झुडपाच्या मागे असलेल्या झाडाखाली उभा होता आणि भुंकत होता. बाकीचे झुडपाच्या मागे उभे होते आणि अर्जुन राजाकडे झुडपातून मार्ग काढत जाऊ लागला.

a

अर्जुन पाहतो तर तिथे काही फाईल्स पडलेले होते. अर्जुन त्या फाईल्स चेक करू लागला. त्याला काही कळत नव्हते त्याने पाटीलला बोलावले.

अर्जुन -" साहेब... इथे या..."

पाटील राजाकडे जात म्हणाला.

पाटील -" काय आहे???"

अर्जुन -" साहेब काही फाइली आहेत..."

पाटील त्या फाईल्सना चेक करू लागला. त्या फाइल्सवर काही नाव होते जसे,' अगरवाल केमिस्ट रिसर्च लॅब ' आणि ' जेनेटिक्स रिसर्च लॅब ऑफ जर्मनी '....

संतोष -" हे दोन फाईल्समध्ये तर काही डाटा आहेत. कसले आहेत हे??"

पाटील -" असं वाटत आहे की काही रिसर्चचे डाटा आहेत...."

संतोष -" पण ही फाईल इथे कशी काय???"

अर्जुन -" स्नेहाचे बॅकग्राऊंड काय आहे??"

चव्हाण - " चेक करावं लागेल..."

पाटील - " मग करा चव्हाण..."

चव्हाण -" हो साहेब..."

चव्हाण मोबाईल काढला आणि कॉल लावला.

संतोष -" अगरवाल रिसर्च लॅब... हे कुठं तर ऐकलय.."

संतोष आठवण्याचा प्रयत्न करू लागला. तेवढ्यात अर्जुन म्हणाला

अर्जुन -" ही तीच लॅब आहे, ज्यात राधाची आई म्हणजे ऋचा काम करत होती..."

पाटील -" ती जेनेटिक्स स्पेशालिस्ट होती ना?? "

तेवढ्यात चव्हाण कॉल कट करत आला आणि म्हणाला.

चव्हाण -" साहेब.. कळालं.. ही स्नेहा जेनेटिक्समध्ये डिग्री घेत होती आणि इंटरशिप रिसर्च लॅबमध्ये करत होती..."

अर्जुन -" कुठल्या??"

चव्हाण -" अगरवाल रिसर्च लॅब...."

ते ऐकताच सगळे चव्हाणकडे पाहू लागले.

अर्जुन -" साहेब.. काहीतरी लिंक आहे या फाईल्स आणि ऋचाचा कीडनेप मध्ये... ते शोधायला हवं.."

संतोष -" ते फक्त या फाईल्समधल्या डाटामुळेच कळणार.."

a

अर्जुन -" साहेब कोणी ओळखीचं जेनेटिक्समधला व्यक्ती आहे का??"

पाटील - " माहिती करून घेतो??... तोपर्यंत आपण या स्नेहाची माहिती काढून घेऊ..."

चव्हाण -" साहेब... तिचा घरचा पत्ता सापडला..."

पाटील -" चला चव्हाण जाऊयात... गाडी काढा.."

चव्हाण -" होय सर..."

अर्जुन - " साहेब... मी आणि संतोषदा दोघे जेनेटिक्स रिसर्च लॅब ऑफ जर्मनी याबद्दल माहिती काढून घेतो..."

पाटील -" हो.. चला चव्हाण..."

पाटील आणि चव्हाण दोघेही पोलिस जीपमध्ये बसून स्नेहाच्या घरी निघाले. इकडे अर्जुन, राजा आणि संतोष सगळे घरी जाण्यासाठी निघाले.

संतोषच्या घरी पोहचताच संतोष पीसी ऑन केला. गूगल वर सर्च करू लागला. जसे त्याने नाव सर्चला घातले,' जेनेटिक्स लॅब ऑफ जर्मनी..' खूप सारे फोटोज् आले. संतोष खूप काही वेबसाइट्स सर्च करू लागला. अर्जुन खुर्ची वर बसून संतोषला सर्च करताना बघू लागला होता. काही आर्टिकल वाचू लागला. त्या आर्टिकलमध्ये एका न्यूजपेपरचे कटिंग्ज लावलेले होते. असेच काही कटिंग बघताना अचानक संतोषला काहीतरी दिसलं.

संतोष -" अर्जुन... लवकर इकडे ये.."

अर्जुन संतोषजवळ जाऊन पीसीच्या मॉनिटरकडे बघू लागला, तर तिथे न्यूजपेपर पेपरच्या कटिंगमध्ये ऋचाचे (म्हणजे राधाची आई) काही फोटो छापलेले होते आणि खूप काही डॉक्युमेंट्ससुद्धा होते. जे फोटो राधाच्या बेडरूममध्ये मिळालेले मेमरीकार्डमध्ये होते ते सुद्धा तिथे होते.

अर्जुन -" हे फोटो इथे कसे??"

संतोष आर्टिकल वाचू लागला.

दुसरीकडे इन्स्पेक्टर पाटील आणि चव्हाण स्नेहाच्या घरी पोहचले. चव्हाण दरवाजाच्या बाजूला असलेली बेल वाजवू लागला. थोड्यावेळाने एक जवळ जवळ ५० वर्षाच्या एक महिलेने दरवाजा उघडले.

ती -" पोलिस... काय झालं सर??"

चव्हाण -" स्नेहा पवारचेच घर आहे ना??"

ती -" होय..."

पाटील -" आपण कोण??"

ती - " मी तिची आई ' गौरी पवार '.... काय झालं सर. सगळं ठीक आहे ना??"

पाटील - " एक वाईट बातमी आहे??"

गौरी - " काय??..."

पाटील -" स्नेहा पवार हीच काल हत्या झाली आहे..."

गौरी - " काय???..."

ती बातमी ऐकताच खाली कोसळली.

पाटील - " मॅडम.... "

पाटील आणि चव्हाण दोघेही तिला उचलण्यासाठी पुढे आले.

++++

a

दुसरीकडे संतोष अजुन पीसीवरच रिसर्च करत होता.

अर्जुन -" संतोषदा.... काही कळाल का??"

संतोष -" यातले काही तर असे कॉन्सेप्ट आहेत जे मला पण कळत नाही..."

अर्जुन -" मग तुझ्यात आणि माझ्यात काय फरक आहे?.."

संतोष - " जरा वेळ दे..."

अर्जुन -" काही तर कळाले असेल ना?"

संतोष -" हे वाचून एवढच कळाल की १९४४ जर्मनीमध्ये हिटलर नी एक न्युक्लिअर बॉम्बस्फोट घडवला. पण एक चूक त्यात घडली की रेडिएशन लीक झाली. झालेल्या लिकमुळे तिथले कित्येक नागरिक मारले गेले. पण स्फोट असल्या शहरात घडवला होता जिथे कमी लोक असतील. "

अर्जुन -" त्याचा आणि ऋचाचा काय संबंध???"

संतोष -" सांगतो... जेंव्हा रेडिएशन लीक झाली तर तिथल्या नागरिकांसोबत तिथले कित्येक प्राण्यांना रेडिएशनचा इफेक्ट झाला. कित्येक पिढ्या अपंग जन्माला झाले. ऋचा जेनेटिक्समध्ये रिसर्च करत होती, तर ती प्राण्यांवर सुद्धा रिसर्च करू लागली होती आणि ती सक्सेस पण होतं होती. जर्मनीमध्ये तिला बोलावण्यात आले. तिथल्या जेनेटिक्स एक्सपर्टससोबत तीने तिथे काम केले आणि ती सक्सेसफुल झाली. तिथल्या प्राण्यांना तीने जेनेटिक्समुळे बरे केले. त्यानंतर ती नागरिकांना सुद्धा बरे करू लागली. पण बरे होण्यासाठी वेळ खूप लागत होता. "

अर्जुन -" ओहह..."

संतोष -" काय ओहह??... एवढं सोपं नव्हते ते, न्युक्लिअर रेडिएशन म्हणजे खूप हानिकारक असतं. तीने कसं काय त्यांना बरं केले असेल??"

अर्जुन -" ते महत्वाचं नाही आहे???... महत्वाचा प्रश्न हा आहे की ती त्या रिसर्चवरून जर रेडिएशन वर उपाय शोधला असेल तर तिचा किडणाप्पिंग का झाला असेल??"

+++++++++

एक अनोळखी व्यक्ती फोनवर बोलत होता.

तो -" येस बॉस..... पण बॉस तो आमच्या गँग मधला आहे.... ओके बॉस...."

कॉल कट करत तो व्यक्ती खुर्चीवरून उठतो. आपल्या टेबलाच्या ड्रॉवरमधून एक गन घेतो. तो व्यक्ती आपल्या केबिनमधून बाहेर आला. तर त्या केबिनच्या बाहेर काही लोक एका व्यक्तीला मारत होते. ती व्यक्ती अगदी रक्तबंबाळ झालेली होती. गन घेतलेला व्यक्ती त्याच्यासमोर आला.

तो - " तुझी काय चुक झाली माहिती आहे का???"

खाली पडलेल्या व्यक्तीने गन घेतलेल्या व्यक्तीकडे पाहिला.

तो - " तू ते फाईल्स तिथे सोडायला नको होतस...."

a

खाली पडलेला व्यक्ती एकच वाक्य म्हणतो, " गुरुजी... तुम्ही मला मारणाराच आहात. पण एक सांगतो तुम्ही चुकीचं करत आहात.... प्रलय येणार नाही...."

खाली पडलेला व्यक्तीच्या डोक्यावर तो गन धरतो... आणि म्हणतो...," प्रलय आनेवाला है...." एवढं म्हणून तो ट्रिगर दाबतो आणि अख्खी इमारत जी मोकळी होती तिथे गोळीचा आवाज घुमू लागला.

++++++++++++++++++++++++

स्नेहा पवारच्या घरांमध्ये गर्दी जमू लागली होती. इन्स्पेक्टर पाटील गौरीला ( स्नेहा पवारची आई ) घेऊन घरात गेलेले होते. पाटील डॉक्टरांना फोन करणारच होते, पण तोवर चव्हाणने गौरीच्या तोंडावर पाणी शिंपडले. तेंव्हा त्या शुध्दीवर आल्या. आजूबाजूला गर्दी होती, तिथे पाटील आणि चव्हाण व्यतिरिक्त आजबाजुचे सुद्धा तिच्या घरी आले होते. गौरी त्या सगळ्यांना पाहताच रडु लागली.

गौरी -" स्नेहा... स्नेहा कुठं आहे???... स्नेहाला काय झालं???"

जेंव्हा तिला परत पाटीलानी स्नेहा बाबतीत सांगीतले तेंव्हा ती मोठ्यांनी रडु लागली....

पाटील -" मॅडम.... आम्हाला माहिती आहे की तुम्हाला खूप दुःख झालेले आहे, पण माझी ड्यूटी आहे. त्यामुळे प्लीज मला को - ऑपरेट करा..."

थोड्यावेळाने गौरी शांत झाली. तिला शांत पाहून पाटील तिला प्रश्न विचारू लागले.

पाटील -" मला सांगा की स्नेहा तुम्हाला जाताना काही सांगितले होती का???"

गौरी शांतपणे उत्तर देण्याचा प्रयत्न करत होती.

गौरी -" ती म्हणाली होती की एक महत्वाचं काम आहे. २ तासांनी येईन..."

पाटील -" जाताना काही घेऊन गेली होती का??.."

गौरी -" काही फाईल्स आणि पर्स घेऊन गेलेली होती.."

पाटीलला थोडे वेगळे वाटले. कारण स्नेहाच्या बॉडी जवळ कोणतेही बॅग सापडली नव्हती.

पाटील -" ती कॉलेजला जात असताना ती अजुन कुठं काम करत होती का??"

गौरी -" होय... ती अगरवाल रिसर्च लॅबमध्ये इंटरशिप करत होती..."

पाटील -" किती दिवसापासून इंटरशिप करत होती??"

गौरी -" जवळजवळ ६ महिन्यापासून करत होती..."

पाटील -" तीच्या वागणूकमध्ये काही फरक वाटत होता का??"

गौरी -" म्हणजे???"

पाटील -" म्हणजे तुम्हाला वेळ न देणे, तुमच्याशी चांगलं न वागणे वगैरे??"

गौरी -" नाही... उलट आम्ही आजकाल खूप खुशीत राहत होतो... ती लॅबमध्ये रिसर्च करत होती आणि तिला पगार सुद्धा मिळत होता.... तिचे बाबा तर कधीच आम्हाला सोडून गेले होते. फक्त आम्ही दोघेच होतो... "

पाटील -" ह्ममम... तुम्हाला हरकत नसेल तर स्नेहाची रूम आम्ही चेक करू शकतो का??"

गौरी -" हो.. ती रूम स्नेहाची आहे... "

गौरी स्नेहाच्या रूमची दिशा दाखवली. चव्हाणला इशारा देताच तो उठला. इशारा समजताच चव्हाण पाटीलसोबत रूममध्ये जाऊ लागला.

रूम तशीच होती जशी एक मुलीची असावी. पिंक कलर वॉल, वॉलवर पोस्टर लावलेले होते. रूम अजुन अस्ताव्यास्त पसरलेले होते, जणू काही स्नेहा काही तासांपूर्वीच इथून गेली असावी. बेडवर लॅपटॉप उघडाच होता. जाताना ती नक्कीच लॅपटॉपवर काम करत असावी. पाटील एकही क्षण वेस्ट घालवता रूम चेक करू लागला. पण चेक करताना तो हातमोजे घालायला विसरला नाही. त्यांना बघून चव्हाणसुद्धा त्याच्या कामाला लागला. पाटील सगळयात आधी लॅपटॉप चेक करू लागला. लॅपटॉप ओपनच होता तर त्याची दाट शक्यता होती की तिच्या बाबतीत महत्वाचं एविडेन्स त्यात सापडेल.

पाटील लॅपटॉप ऑन करण्याचा प्रयत्न करू लागताच त्याला कळाल की लॅपटॉपला पासवर्ड आहे. लॅपटॉप आता एकच जण ओपन करू शकत होता, तो म्हणजे संतोष. त्यामुळे तो लॅपटॉप सोबत घेऊन

जाण्याचा विचार करू लागला. चव्हाण बाकीच्या ठिकाणी तपास करू लागला होता. जसे टेबलावरचे काही पुस्तक, त्याच टेबलच्या खाली असलेली ड्रॉवर इत्यादी तो चेक करू लागला. पाटीलानी लॅपटॉप सील करून ठेवला, जेणेकरून तो जाताना घेऊन जावा. त्यानंतर तो रूममधील बाकीच्या ठिकाणी शोध सुरू केला.

पाटील -" काही सापडलं का, चव्हाण??"

चव्हाण -" नाही साहेब... अजुन तरी काही नाही सापडले. "

पाटील -" चव्हाण... मला सांगा समजा तुम्ही चुकीचे काम केलास आणि तुला पुरावा मिटवायचा असेल, तर तू काय करणार??"

पाटीलानी विचारपूर्वक हा प्रश्न केला होता.

चव्हाण -" मी ते फेकलो असतो... "

चव्हाणच्या तोंडातून हा उत्तर ऐकल्यावर पाटीलची ट्यूब पेटली. तो लगेचच टेबलाजवळ असलेला कचऱ्याच्या डब्यात शोध घेऊ

लागला. त्या कचऱ्यात ते एका अश्या काही पुराव्याच्या शोधत होते, ज्यांनी स्नेहाच्या मृत्युचं कारण समजेल. खूप सारे फाटलेले कागद त्या कचऱ्यात होते. शोध घेत असताना त्याचा लक्ष एक चुरघळलेल्या कागदावर गेला. तो कागद नीट करून बघू लागला.

पाटील -". हे तर डेबिट कार्डच्या बिल आहेत.."

चव्हाणांचे पाटीलाच्या बोलण्याकडे लक्ष गेले, त्यामुळे त्या कागदाकडे ते बघू लागले.

चव्हाण -" अरे तिच्या...... १,००,००० चे बिल.."

पाटील -" एवढं जर ती पैसे खर्च करत होती, तर तिच्याकडे अजुन किती पैसे असतील???..."

पाटील थोडा विचार करू लागला.

चव्हाण -" साहेब... हिचा अकाउंट डिटेल्स काढावं लागेल.."

पाटील -" ह्या बिल वर डेबिट कार्डचा नंबर आहे... पहिला हे काम करा... डेबिट कार्डचे डिटेल्स काढा.."

पाटीलनी ऑर्डर सोडली तसे चव्हाणनी ते बिल घेतले.

चव्हाण - " हो साहेब..."

पाटील लॅपटॉप आपल्या ताब्यात घेऊन परत खाली येऊ लागला. खाली येताच तो गौरीला प्रश्न करू लागला.

पाटील - " मला सांगा... आजकाल स्नेहा खुशीत होती असे तुम्ही म्हणत होतात... तर कशाप्रकारे खुशीत होती ती??"

गौरी -" म्हणजे???"

चव्हाण -" म्हणजे की ती खुशीत होती ते तुम्हाला कसं कळाले?"

गौरी -" मी काही वर्षांपूर्वी लोन घेतले होते. स्नेहाच्या शिक्षणासाठी म्हणून.... काही दिवसापूर्वी तीने ते लोन क्लिअर करून टाकली. "

पाटील -" तुम्ही तिला विचारलं नाही का? की कुठून आले एवढे पैसे??"

गौरी -" विचारले... ती म्हणाली की स्कॉलरशिप मधून आणि पगारातून सेव्ह केलेले पैसे यातून तीने लोन फेडली.."

पाटील -" किती लोन काढला होता तुम्ही?"

गौरी -" २,००,००० रुपये.."

चव्हाण -" एवढे पैसे तीने फेडलं??.. "

गौरी -" हो..."

पाटील - " बरं... आम्ही जे लॅपटॉप घेऊन जात आहे... पुरावे शोधण्यासाठी म्हणून.. तुम्हाला काही प्रॉब्लेम??"

गौरी मान हलवत इशारा दिला.

पाटील - " ओके... आम्ही तपासणी करणार आहोत... तुमची गरज पडली तर आम्ही तुम्हाला बोलावून घेऊ. तो पर्यंत तुम्ही हे शहर सोडून जाऊ नये."

गौरी -" होय सर.."

एवढं बोलून चव्हाण आणि पाटील बाहेर पडले. चव्हाण गाडीमध्ये बसत असताना काही प्रश्न करू लागला.

चव्हाण -" साहेब... स्नेहाने एवढं लोन कसे काय फेडली असेल??... म्हणजे बघा ना... माझी ही नोकरी आहे. तरी सुद्धा मी एकत्र एवढे पैसे फेडू शकलो नसतो.."

पाटील -" तेच तर खटकतय मला चव्हाण... तुम्ही त्या डेबिट कार्डच्या डिटेल्स मागवून घ्या. त्यावरूनच काहीतरी कळेल आपल्याला... "

a

चव्हाण -" होय साहेब... पण मला वाटतं ती वेगळचं काम करत असावी म्हणून एवढे पैसे तिच्याकडे आलेले होते."

पाटील - " ते तपासणी केल्यावरच कळणार ना.."

चव्हाण -" हो साहेब..."

दोघेही पोलिस स्टेशनला गाडी घेऊन जात होते. बॉडी पोस्टमॉर्टमला पाठवली होती.

पाटील - " चव्हाण.... पी. म चा रिपोर्ट कधी येणार आहे??"

चव्हाण - " साहेब.... उद्या ते रिपोर्ट्स तुमच्या हातात असतील..."

पाटील - " बरं... "

पाटील आपल्या टेबलावर जाऊन बसत असताना मोबाईल काढून कुणाला तरी कॉल लावत होते. कॉल पिक अप झाल्यावर पाटील विचारपूस करू लागले.

पाटील -" हॅलो.... संतोष.."

संतोष -" हा... बोला सर..."

पाटील -" त्या फाइलव्दारा काही कळाले का??"

संतोष -" हा सर.... खूप मोठा लोचा आहे सर..."

पाटील -" म्हणजे???"

संतोष -" म्हणजे सर.... त्या साठी इतिहासात जावं लागेल.."

पाटील -" डिटेलमध्ये सांग..."

संतोष -" असे सांगता येत नाही सर.... भेटल्यावर सांगतो.."

पाटील -" ओके... बरं स्नेहाच्या घरातून मी लॅपटॉप एविडेन्स म्हणून जप्त केलेला आहे. पण त्याला पासवर्ड आहे. तू क्रॅक करू शकतो ना??"

संतोष -" हो सर.... ये तो मेरे बाये हाथ का खेल है.."

पाटील -" बरं... मी घेऊन येतोय... "

संतोष -" ओके सर..."

कॉल कट करून पाटील टेबलावरील फाईल घेऊन स्टडी करू लागतो.

रात्रीचे आठ वाजत आले होते. पाटील अजुन स्टेशनमध्ये चव्हाण यायची वाट बघत होते. कंटाळून ते संतोषकडे जाण्यासाठी बाहेर आले, तर वाटेत चव्हाण येताना दिसला.

पाटील -" चव्हाण... एवढे का उशीर झाला?"

चव्हाण -" साहेब... तो रिपोर्ट तयार करून देताना उशीर झाला.... हा घ्या..."

a

एवढं बोलून चव्हाण हतातली फाईल पाटीलला दिला.

पाटील -" बरं चल... संतोषकडे जायचं आहे??"

पाटील आणि चव्हाण दोघेही अवघे दहा मिनिटात संतोष च्या घरी पोहचले.

संतोष - " या सर..."

पाटील -" चल संतोष... हे घे लॅपटॉप आणि कामाला लाग..."

अर्जुन, चव्हाण आणि पाटील फाईल वाचण्यात बिझी झाले.

पाटील -" चव्हाण.... स्नेहाच्या बँकमध्ये खूप ट्रांझेशन झाले आहेत... ते पण लाखोंचे ट्रांझेशन झाले आहेत... "

चव्हाण -" हो साहेब... आणि हा बघ अकाउंट नंबर ज्यातून स्नेहाच्या अकाऊंटमध्ये पैसे ट्रान्स्फर झाले आहेत."

a

पाटील -" कुणाच्या नावावरून हा अकाउंट आहे??"

चव्हाण -" साहेब... हा तर इंटरनॅशनल अकाउंट आहे.."

पाटील -" कुठल्या देशातून??"

चव्हाण -" चीनमधून..."

पाटील -" चीनमधून एवढे पैसे स्नेहाच्या अकाऊंटमध्ये कशाला ट्रान्स्फर केलं असाव??"

तेवढ्यात संतोष चा आवाज आला.

संतोष -" सर.... लॅपटॉप इस रेडी टू युज.."

त्याच हे बोलणं ऐकून पाटील,चव्हाण आणि अर्जुन तिघेही लॅपटॉप जवळ आले. संतोष लॅपटॉपच्या फाईल्स चेक करू लागला होता. त्या फाईल्स मध्ये स्नेहाचे पर्सनल फोटोज् होते. संतोषने प्रेकॉस्शन म्हणून एक पेन ड्राईव्ह लॅपटॉपला लागला. जसे जसे तो फाईल्स ओपन करत होता

तसे तसे तो पेन ड्राईव्ह मध्ये कॉपी करून घेत होता. लॅपटॉपला नेट कनेक्ट करून त्याने स्नेहाचे सगळे सोशल मीडिया अकाउंट चेक केले तर तिथे सुद्धा काहीच क्लू सापडला नाही.

पाटील -" संतोष... तिचा इमेल्स चेक कर..."

संतोष -" हो सर..."

मेल्स चेक करत असताना खूप इमेल्स चीनच्या अकाउंटवरून आलेले होते. संतोष लगेचच कॉपी करू पाहत होता. पण ते इमेल्स फक्त अकाउंट ट्रान्स्फर चे होते. सर्वात अगोदरचे इमेल्स तो चेक करू लागला. एका ईमेल वॉर्निंग असं नाव लिहिलेला होता.

संतोषने तो ईमेल ओपन केले. तर तिथे एक डॉक्युमेंट जोडलेले होते. ते डॉक्युमेंट ओपन केले, तर अचानक लॅपटॉप हँग होऊ लागतो. लॅपटॉपच्या स्क्रीनवर फक्त महाराष्ट्राचा नकाशा येतो आणि त्याच्यावर, ' Pr LaY '

a

असे लिहिलेला होता. सगळे त्याकडेच बघू लागतात. ती स्क्रीन बंद चालू होतं होती. सगळे निरखून त्याला बघत होते. अचानक एक स्पार्क झाला आणि ते लॅपटॉप बंद पडला.

संतोष - " शिट... शीट... "

संतोष लगबगीने लॅपटॉपला कनेक्ट केलेला पेन ड्राईव्ह काढू लागतो.

पाटील -" काय झालं... काय झालं संतोष..."

संतोष -" सर... लॅपटॉप त्या डॉक्युमेंट मुळे हॅक झाला आणि सगळे फाईल्स डिलीट झाले... शीट..."

अर्जुन मधेच बोलू लागतो.

अर्जुन - " साहेब... मग आता??"

पाटील फक्त ऐकत त्या लॅपटॉपला बघू लागले होते. त्यांच्या हातून एक महत्त्वाचं एविडन्स गेलेला होता. ते असेच विचार करत होते, तर पाटीलला शांत बघत चव्हाण म्हणाला.

चव्हाण -" साहेब... आता??"

पाटील -" माहिती नाही... पहिला आपण स्टेशनला जायला हवं. तिथे आपल्याला एका व्यक्तीला भेटायचं आहे."

चव्हाण -" कोण सर??"

पाटील -" तिथे गेल्यावर तुम्हाला कळेल. अर्जुन आणि संतोष तुम्ही दोघंसुद्धा चला. "

संतोष - " ओके सर..."

संतोषच्या त्या वाक्याने अर्जुनसुध्दा मान हलवत होकार दर्शवला.

अर्जुन - " राजा... चल..."

एवढ म्हणताच निवांत बसलेला राजा उठून शेपूट हलवत भूंकला. शेवटी पाटील इन्स्पेक्टर कॅप घालत म्हणाले.

पाटील -" चव्हाण गाडी काढा."

ऑर्डर मिळताच चव्हाण गाडी काढण्यासाठी गेला. सगळे संतोषच्या घरातून बाहेर पडले. खाली येताच सगळे पोलिस स्टेशनला रवाना झाले.

काहीवेळाने गाडी स्टेशनसमोर उभी राहिली. क्रमाक्रमाने सगळे त्यातून बाहेर येऊन स्टेशनमध्ये जाऊ लागले. सर्वात आधी इन्स्पेक्टर पाटील आणि त्यानंतर बाकी सगळे केबिनमध्ये येऊ लागले. पाटील आपल्या सीटवर बसताच त्यांच्या टेबलावर असलेला फोन वाजू लागला. एक रिंग वाजताच पाटीलानी तो फोन रिसिव्ह केला आणि बोलू लागले.

पाटील -" हॅलो....... ते आले आहेत काय???"

पुढून काहीतरी उत्तर ऐकल्यावर, थोडा विचार करून पाटील म्हणाले.

पाटील -" बरं... पाठवून द्या आत.."

अस म्हणताच केबिनमध्ये असलेले सगळयांच्या तोंडावर प्रश्नचिन्ह उभं राहिलं की कोण येणार आहे??... थोड्यावेळाने एक मधुरसा आवाज केबिनच्या दारापासून आला.

ती - " May I come in sir??"

मुलीचा आवाज ऐकताच संतोषचा लक्ष तिच्याकडेच गेलं. तिथे एक मुलगी उभी होती. जिच्या हातात एक फाईल होती. तिच्या त्या शॉर्ट अँड सिल्की केसांना बघून संतोष फक्त आता बेशुध्द होणारच होता. तिचे त्या डोळया वरील स्पेक्ट्सला बघून कोणीसुद्धा तिला "क्युटी" असे नाव दिले असते. ती दिसतच होती इतकी "क्यूट". संतोष काय इतर कोणताही मुलगा असता तर तो केव्हाच घायाळ झाला असता. तो सुंदर अश्या मुलीकडे पाहत हरवलाच होता तेवढयात राजाने भुंकुन त्याचे स्वप्न भंग केला.

पहिल्यांदाच संतोषला राजाचा राग आला होता.

पाटील -" Come in..."

ती घाबरतच पाटीलच्या टेबलाजवळ आली.

पाटील -" चव्हाण... ही जान्हवी आहे. नुक्लियर रिसर्च करणारी स्टूडेंट आहे. ही आपल्याला या केसमध्ये हेल्प करणार आहे."

संतोष उत्साहात मोठ्या आवाजाने म्हणाला.

संतोष -" होय का??... "

त्याच्या आवाजानेच जान्हवी घाबरली आणि स्वतःच स्पेक्ट आणि हातात असलेले फाईल्स सांभाळतच हळू आवाजात म्हणाली.

जान्हवी -" हो.."

a

पाटील -" जान्हवी.... तुला मी आम्हाला मिळालेल्या फाईल्स पाठवले होत्या... काही कळाल का? "

जान्हवी -" हो सर.... ऋचा अगरवाल या एक जेनेटिक सायंटिस्ट होत्या. जेंव्हा जर्मनीमध्ये १९४४ मध्ये अणुबॉम्ब चाचणी केली गेली. तेंव्हा रेडिएशनमुळे तिथल्या लोकांवर परिणाम झाला. त्यांचे पुढील जनरेशनवर सुद्धा परिणाम दिसू लागले. पण ऋचा मॅडमनी जेंव्हा रिसर्च ( २००६) सुरू केले. तेंव्हा त्यांना कळाले की डी. एन. ए मध्ये जेनेटिक बदल घडवून लोकांना बरे करू शकतो. त्यामुळे त्या कामात त्यांनी लक्ष घातले."

पाटील -" मग त्यांचं किडनेप का केलं असणार??"

संतोष-"माहिती नाही.."

संतोष असं म्हणताच सगळे संतोषकडे बघू लागले. संतोषची नजर मात्र जान्हवीच्या रूपाला निहारत होती. जेंव्हा त्याला कळाले की इन्स्पेक्टर पाटीलसुद्धा त्याला बघत आहेत. तेंव्हा तो शुध्दीवर वर आला.

a

अर्जुन -" साहेब.... कोणी कुणाला का कीडनेप करत असेल बरं??"

पाटील -" पैसेसाठी??"

अर्जुन -" पण त्यांचं किडनेप झाल्यावर असा काही फोन नाही आला. "

अर्जुन काहीतरी तर्क लावत बोलत होता.

चव्हाण -" मग किडनेप कशासाठी झालाय??."

अर्जुन -" त्यांना ऋचा मॅडमकडून काहीतरी हवे असेल??"

संतोष -" हो.... पण त्यांना फायदा कसा होऊ शकतो?"

जान्हवी -" एका जेनेटिक सायंटिस्ट पासून काय फायदा असू शकतो...."

अर्जुन विचार करत इकडे तिकडे फिरू लागला. तेवढ्यात संतोष म्हणाला.

संतोष -" कदाचित.... त्यांच्यापासून त्यांना काही नुकसान होतं असेल...."

पाटील -" नाही संतोष.... जर नुकसान होतं असले असतं तर तिला जिवंत ठेवलं नसतं..."

जान्हवीला काहीतर आठवल्या सारखं झालं आणि ती मधेच बोलू लागली.

जान्हवी -" सर.... जर तुम्हाला एक सांगायचं राहूनच गेलं."

पाटील -" काय??"

सगळ्यांचं लक्ष आता जान्हवी कडे लागून होती.

a

जान्हवी -" १९४४ मध्ये जेंव्हा हिटलर आत्महत्या केली होती. त्याच्या आधी त्याचा एक प्लॅन होता. तो एक न्यूक्लियर बॉम्ब बनवायचा प्रयत्न करत होता. "

संतोष - " हो... ते तर माहितीच आहे... त्यात काय विशेष??"

जान्हवी -" विशेष आहे... कारण तो न्यूक्लियर बॉम्ब जेनेटिकली करणार होता.."

पाटील - " म्हणजे? "

जान्हवी - " म्हणजे जेंव्हा १९४४ मध्ये अणुबॉम्ब ची चाचणी झाली, तेंव्हा ती तर फक्त डेमो होती. खरंतर तो जेनेटिक वापरून जेनेटिक न्यूक्लियर बॉम्ब तयार करणार होता. त्याचा ब्लूप्रिंट पण तयार होते. पण, त्याच्या आत्महत्या नंतर ते कुठं गेलं?? माहिती नाही..."

संतोष -" यातून काय सिद्ध होत??"

a

जान्हवी -" यातून हे सिद्ध होतं की कदाचित ऋचा मॅडमला या बॉम्बच्या निर्माण साठी किडनेप केले असेल तर..."

पाटील -" असू शकते... "

संतोष -" सर... पण ती तर मग आता बाहेरच्या देशात असेल..."

अर्जुन -" नाही... खून इथे होतं आहेत... म्हणजे जे कोणी असेल ते इथेच आले असतील..."

पाटील -" अर्जुन बरोबर म्हणतोय..."

अर्जुन -" संतोष दा... पी. सी बंद होण्याच्या अगोदर काय दिसत होत..."

संतोष -" महाराष्ट्राचं नकाशा आणि PraLaY अस लिहिलेलं होत."

a

अर्जुन पाटीलच्या टेबलावर असलेली डायरी घेतली आणि त्यावर तो प्रलय लिहिला. नंतर केबिनमधील भिंतीवर असलेल महाराष्ट्राचं नकाशा पाहू लागला. इतका वेळ गप्प बसलेला चव्हाण म्हणाला.

चव्हाण -" काय शोधू लागलास?"

अर्जुन -" लिंक..."

थोडा वेळ शोधल्यावर तो वळला आणि म्हणाला

अर्जुन -" साहेब... PraLaY या मधील La म्हणजे लातूर आणि Y म्हणजे यवतमाळ आहे. या शहरात बॉम्बस्फोट होणार आहे..."

चव्हाण -" आणि Pra म्हणजे?"

अर्जुन -" हेच तर कळत नाहीये..."

पाटील -" पण... मुंबई, पुणे इतके मोठे शहर सोडून इथे का बॉम्बस्फोट होईल??"

अर्जुन -" साहजिकच साहेब... जर तुम्हाला कळालं की बॉम्बस्फोट होणार आहे, तर तुम्ही पहिला मुंबई, पुणे असल्या मोठ्या शहरात कडक बंदोबस्त करणार... आणि हे दोन शहराचा कोणी विचारसुद्धा नाही करणार..."

संतोष -" सर... वी हेव टू इन्फोरम.."

तेवढ्यात पाटीलच्या टेबलावरील फोन खणखणला. पाटील वेळ न घालवता रिसिव्ह केला.

पाटील -" हॅलो..."

पुढील व्यक्ती म्हणतो.

व्यक्ती - " फोन उस बच्चे को दो..."

पाटील -" कौन हो तुम?"

व्यक्ती -" इन्स्पेक्टर सहाब... वक्त कम है मेरे पास और तेरे पास भी, तो चुपचाप उस बच्चे को दे..."

परिस्थीतीचे गांभीर्य लक्षात घेऊन पाटील यांनी फोन लाऊड स्पीकर वर ठेवला.

व्यक्ती -" ओये इन्स्पेक्टर... मैने तुझे बच्चे को फोन देने को कहा है, लाऊड स्पीकर पे रखने को नही कहा..."

सगळे चकित झाले. कुठूनतरी तो नजर ठेवत होता. पाटील नाईलाजाने फोन अर्जुनला दिला.

व्यक्ती - " क्या रे बच्चे.... एक लडकी का तो खून हूआ है... क्यू इतना कुछ कर रहे हो??... तेरे हाथ से कुछ नही होगा... "

तो व्यक्ती तसंच बोलत होता. अर्जुन त्याचा ऐकत आजूबाजूला लक्ष देत होता. तेंव्हा त्याला कळाले की त्यांच्या केबिनमध्ये सी. सी. टी. वी कॅमेरा लावलेला होता. त्याला लक्षात आले. तो जो कोणी आहे तो इथूनच त्याच्यावर लक्ष ठेवत होता. अर्जुन त्याच बोलणं ऐकत होता.

व्यक्ती -" अबे स्कूल जा... तेरा ये काम नही है.."

अर्जुन इतकं वेळ ऐकुन बोलला. तो सुद्धा मुंबईच्या रस्त्यावर राहत होता. त्याला माहिती होतं की असल्या माणसाला कसं बोलायचं.

अर्जुन -" क्यू बे फट रही है क्या?..."

एवढे बोलून अर्जुन हसू लागला. त्याच्या एका वाक्यावर त्याचे तोंड काही सेकंदासाठी गप्प झाले.

व्यक्ती -" अे बच्चे... मेरे पास आने की जरुरत तुझे नही पडेगी. क्युकी तू नही बचनेवाला है... तू ही क्या पुरा महाराष्ट्र जलेगा... "

अर्जुन गांभीर्य पणे ऐकत होता...

व्यक्ती -" बचा सकते हो तो बचाव इस महाराष्ट्र को.. १५ दीन है तुम्हारे पास..."

a

एवढं बोलून तो अर्जून च्या उत्तराची वाट पाहू लागला....

अर्जुनने हसतच उत्तर दिले.

अर्जुन -" चल झुटा...."

एवढं ऐकून पुढच्या व्यक्तीने रागातच फोन ठेवला.. आता एक युद्ध छेडलेले होते... फक्त १५ दिवस राहिले होते...

ती व्यक्ती थोडावेळ रागातच बसली होती, त्यानंतर त्याने एक दीर्घश्वास घेतला.

काहीकाळ असाच गेला. ती व्यक्ती बसून असताना त्याच्याजवळ एक व्यक्ती आली. ज्याने लेदरचे जॅकेट घातले होते. त्याची मोठी दाढी, त्याचे ते धिप्पाड शरीर बघून कोणालाही भीती वाटली असती. ती व्यक्ती, त्या बसलेल्या व्यक्तीला उद्देशून म्हणाली.

-" गुरुजी.."

त्याच्याकडे न बघताच बसलेला व्यक्ती म्हणाला.

गुरुजी -" हा बोलो.. इस्माईल.."

इस्माईल -" गुरुजी... मिशन को अंजाम तक कब पोहूचानां है."

गुरुजी -" हमे जलद से जलद मिशन सक्सेस करना पडेगा."

इस्माईल -" जनाब... वो चिनी लोग बार बार यही सवाल पूछ रहे है."

गुरुजी -" उनको बोलो की पैसा आपका है, तो ज्यादा न बोले. मिशन सक्सेस होगा."

इस्माईल -" गुरुजी... एक पुछू?"

गुरुजी -" हा.."

इस्माईल -" मुंबई, पुणे ऐसे बडे शहर छोडकर ये छोटे शहर पर क्यू उडाना है?"

तो जरासे स्माइल करत म्हणाला.

गुरुजी -" यही तो गलती करते हे हम इस्माईल. हर बार हम मुंबई को टार्गेट बनाते है. इसिलिये पोलिस वहाँ पे ज्यादा ध्यान रखते है. इन छोटे शहर को कोई ध्यान नही देता और लोग तो वहा भी रहते है."

इस्माईल -" लेकीन वो लडका ओर वो पोलिस इन्स्पेक्टर रास्ते मे आ रहे है."

गुरुजी -" उसकी चिंता मत करो. तुम बस मिशन पर ध्यान दो."

इस्माईल -" ठीक है गुरुजी.."

इतक्यात अजुन एक व्यक्ती आला.

व्यक्ती -" गुरुजी.. उसने काम कर दिया. "

इस्माईल हसतच बसलेल्या त्या व्यक्तीला म्हणाला.

इस्माईल -" मुबारक हो जनाब.."

बसलेली व्यक्ती तोंडावर थोडीसी स्माइल करत उभा राहिली आणि म्हणाली.

गुरुजी -" चलो.. देखते है कैसे काम किया उसने.."

तिघेही त्या रूममधून बाहेर आले. ती एक भव्य इमारत होती. बाहेरून गलिच्छ वाटत असली तरी आतून मात्र एक भल्या मोठ्यां किल्ल्या सारखं वाटत होतं. काहीजण गन घेऊन गुरुजीच्या मागे फिरत होते. तिथे बघितल्यावर कुणालाच वाटणार नाही की काय चालू आहे..

ते लोक आता एका मोठ्याशा दारापुढे उभे होते. ते एक लॉक झालेल्या लॉकर असल्या सारखी वाटत होते. त्यात तो गुरुजी असलेला त्या लॉकरच्या स्क्रीनवर डोळे लावले. त्या स्क्रीनवरून एक लेझर आली त्याच्या डोळयाला स्कॅन करू लागली. स्कॅन झाल्यावर ती लॉकर कम दार उघडू लागले. हळूहळू दार उघडताना आतील दृश्य दिसू लागलं. आत

a

कित्येक स्क्रीन होते. त्यात कसले तरी डाटा दिसत होती. गुरुजी आणि बाकीचे आत शिरले.

आत जाताच गुरुजी एका खुर्चीवर बसले. त्याच्या मागे बाकीचे उभे राहिले.

गुरुजी -" सूना है... काम हो गया है."

एका भल्या मोठ्या मशीनच्या मागून एक मास्क घालून एक महिला आली. बाहेर आल्यावर ती मास्क काढली.

गुरुजी -" क्यू ऋचा मॅडम... काम हुआ ना..."

ऋचा ( राधाची आई ) काही भावना न दाखवता मान हलवते.

गुरुजी -" अच्छा.... "

ऋचा थोडी अडखळत म्हणाली.

a

ऋचा -" तुमने वादा किया था की मुझे मेरी बेटी से मिलावोगे.. "

गुरुजी -" अरे इतनी जलदी भी क्या है?... पहिले देख तो ले की क्या कमाल किया है तूमने??"

तिच्या मनात नसतानाही ती फक्त तिच्या मुलीसाठी ते काम करत होती. गुरुजी त्याच्या जागेवरून उठला आणि त्याच्या पुढे असलेले तीन मोठे मशिन्सच्या समोर आला.

गुरुजी -" जैसे बोला था वैसे ही किया ना?"

ऋचा फक्त मान हलवली. तिच्यासोबत असलेला असिस्टंट पुढे येऊन म्हणाला.

तो -" हा गुरुजी... वैसे ही बनाया है. अब सिर्फ धमाका नाही होगा. पुरा महाराष्ट्र इसके चपेट में आ जायेगा. "

गुरुजी एक मोठी अशी स्माइल देत म्हणाला.

a

गुरुजी -" अब सिर्फ महाराष्ट्र ही नही उसकी शान को भी उडाना है.
"

हे वाक्य ऐकताच ऋचापुढे येऊन जोरात म्हणाली.

ऋचा -" तुझे जो चाहिए था, वो मिल गया ना. अब मुझे मेरी बेटी को मिलने दो."

तिचा आवाज जोराचा ऐकल्यावर इस्माईल पुढे आला नि गन तिच्या डोक्यावर ठेवली.

इस्माईल -" गुरुजी... हुकूम करो. यही ठोकता हु."

गुरुजीने हात हलवत, नको असा इशारा दिला आणि तिच्याजवळ येऊन म्हणाला.

गुरुजी -" मॅडम.... मेरे से एक गलती हो गयी. तुम्हारी बेटी राधा का खून मेरे हातों से हो गया.."

a

हे वाक्य ऐकताच ऋचाला धक्का बसला. तीनें त्याच्याकडे रागाने बघितले अन् किंचाळली.

ऋचा -" काय???"

हे म्हणतच ती त्याच्या अंगावर धावून गेली. त्याचा कॉलर पकडत म्हणाली.

ऋचा -" you bastard..."

तिला असं बघून इस्माईलने पुढे येऊन तिला धरला आणि जोरात खाली आपटला. गुरुजी त्याची कॉलर नीट करून म्हणाला.

गुरुजी -" इसका बहुत हुआ... "

एवढं बोलून तो स्वतः कडे असलेली गन काढली आणि खाली पडलेल्या ऋचावर रोकुन धरला.

a

हे बघून मागून तिच्यासोबत काम करत असलेला एक जण पुढे आला.

तो -" गुरुजी.... इसे मत मारना... अगर ये मर गयी. तो ये बॉम्ब नही लगेगा. "

गुरुजी थोडावेळ विचार करत उभा राहिला. नंतर तिच्यावर रोखलेली गन बाजूला काढली. तिच्याकडे वाकून म्हणाला.

गुरुजी -" बस थोडे दिन... उसके बाद प्रलय आएगा.."

एवढं बोलून तो उठला आणि बाहेर जाऊ लागला. त्याच्यासोबत बाकीचे सुद्धा बाहेर गेले आणि दार बंद झाली. त्या मोठा अश्या लॅबमध्ये हे दोघेच होते. ऋचा मोठयाने रडु लागली. तिची एकुलती एक मुलीचा खून झालेला होता. तिला धीर देण्यासाठी तिचा सहकारी खाली बसला आणि तिच्या खांद्यावर हात ठेवला.

++++++++++++++++++++++++++++

इकडे अर्जुन, राजा ( कुत्रा), संतोष, जान्हवी, इन्स्पेक्टर आणि चव्हाण अजुन केबिन मध्येच होते. त्या फोन कॉलनी सगळ्यांना धक्का दिलेला होता.

अर्जुन -" पाटील साहेब.... आता काय करायचं??"

पाटील -" अर्जुन.... ही आता साधीसुधी केस राहिली नाही. इंटरनॅशनल केस बनलेली आहे. यासाठी आपल्याला कमिशनर सोबत मीटिंग घ्यावी लागेल. "

अर्जुन -" पण साहेब... एक गोष्ट लक्षात आली आहे, ती ही की तो आपल्याला पाहत होता. "

चव्हाण -" अरे तेच मला समजत नाहीये.."

चव्हाण डोके खाजवत म्हणाला.

अर्जुन -" अहो चव्हाण साहेब... आपल्या केबिनमध्ये एक सी. सी. टी. व्ही कॅमेरा आहे. विसरलात काय?"

सगळे तिकडे बघू लागले. तेवढ्यात संतोष म्हणाला.

संतोष -" ते कॅमेरा नक्कीच हॅक केले असतील."

जान्हवी -" इन्स्पेक्टर... आपल्याला लवकरच काहीतरी करावं लागेल. ऋचा मॅडम त्यांच्यासोबत आहेत म्हणल्यावर ते कुठूनतरी डी. एन. ए मध्ये बदल त्यांच्याकडून घडवून सगळ्यांना नुकसान करतील. मॅडम सुद्धा कोणत्यातरी मजबुरीमध्ये करत असतील. "

परिस्थीती गंभीर आहे हे कळल्यावर पाटील खुर्चीवरून उठले आणि म्हणाले.

पाटील -" चला.. कमिशनर ऑफिस कडे.."

सगळ्यांच्या डोळयात एक वेगळीच चमक आली. सगळे बाहेर आले आणि जीपमध्ये बसले.

थोड्यावेळाने ते कमिशनर ऑफिसजवळ पोहचले. सगळे उतरून त्या ऑफिसमध्ये गेले. सुदैवाने कमिशनर ऑफिसमध्ये होते. त्यांची परवानगी घेऊन ते सगळे आत गेले.

पाटील आणि चव्हाण दोघांनीही त्यांच्यासमोर येऊन कडकं सॅल्युट मारले.

कमिशनर -" पाटील... काय भानगड आहे? "

पाटील समोर येऊन सगळी घटना आणि सगळे पुरावे कमिशनरच्या समोर ठेवले. कमिशनरला सुद्धा आता परिस्थिती गंभीर आहे हे कळून चुकलं.

कमिशनर -" हो अर्जुन तर खूपच स्मार्ट आहे."

अर्जुन त्या वाक्याला महत्व न देता पुढे येऊन म्हणाला.

अर्जुन -" साहेब... आपल्याला काहीतरी करावं लागेल. "

कमिशनर काहीतरी विचार करत म्हणाला.

कमिशनर -" जर आपण मोठी हालचाल केली, तर ते सावध होतील. आपल्याला सिक्रेटली करावं लागेल."

अर्जुन -" साहेब... एक सांगू..."

कमिशनर -" हा सांग..."

अर्जुन -" साहेब... मला फक्त पाटील साहेब, चव्हाण साहेब आणि तुम्ही एवढेच या केबिनमध्ये हवं आहे. मला माझी योजना बाहेर जायला नकोय."

पाटील, संतोष आणि जान्हवी या दोघांना बाहेर जायला सांगितले. ते दोघे बाहेर गेले. संतोषला वाईट वाटलं. कारण पहिल्यापासून तो यामध्ये होता. आता नेमका तोच तिथे नाही आणि त्यानंतर खुशसुद्धा झाला, कारण त्याच्यासोबत क्यूटशी जान्हवी होती. ते दोघे बाहेर येऊन बसले. आतमध्ये प्लॅन बनत होता आणि हे दोघं बाहेर बसले होते. आतली काहीही खबर या दोघांना नव्हती. जान्हवी तशी खाली मान घालून आपलं

अंग एकवटून बसली होती. संतोष त्याच्या प्रेमाची पोळी भाजू पाहात होता. तिच्या अजुन जवळ सरकत म्हणाला.

संतोष -" तुला इतकं सगळं कसं माहिती?"

जान्हवी खाली घातलेली मान न वर करता फक्त नजर वर करून म्हणाली.

जान्हवी -" म्हणजे?"

संतोष -" म्हणजे ते डी. एन. ए च वगैरे??"

जान्हवी - " मी ऋचा मॅडम सोबत त्यांच्याच लॅबमध्ये कामाला होते. म्हणून तर इन्स्पेक्टरनी मला या केसमध्ये मदत करायला बोलावले. "

संतोष -" अच्छा.... मग तू ती लॅब का सोडलीस?"

जान्हवी आता ताठ बसत म्हणाली.

a

जान्हवी -" ऋचा मॅडम जेंव्हा बेपत्ता झाली होती. तेंव्हाच मला त्या लॅबमध्ये नकोस वाटत होतं. त्यामुळे मी लॅब सोडले."

संतोषने ह्मम म्हणत मोठा दीर्घश्वास सोडला.

संतोष -" घरी कोण कोण आहे तुझ्या?"

ती त्याच्याकडे न बघताच म्हणाली.

जान्हवी - " आई, बाबा आणि मी.."

ती लहान आवाजात म्हणाली. त्या गोड आणि नाजूक आवाजाने संतोषच्या मनात स्पंदने उडत होती. न राहवून त्याने त्याच्या मनातला प्रश्न विचारला.

संतोष -" तुला कोणी बॉयफ्रेंड आहे का?"

a

हा प्रश्न ऐकताच ती अचानक संतोष कडे लटक्या रागाने पाहिले आणि नजर परत फिरवली. तिच्या बॉब कट केलेल्या केसांना कानामागे घेत आणि चष्मा नाकावर सावरत हळू आवाजात म्हणाली.

जान्हवी - " नाही..."

संतोषला नवलच वाटलं.

संतोष -" का?"

जान्हवी -" का म्हणजे??.. कोण माझ्या प्रेमात पडेल??"

संतोष तिच्या डोळयात डोळे घालून म्हणाला.

संतोष - " मी पडलोय..."

काहीक्षण त्या दोघांची नजर एकमेकांना भिडली. ती वेळ तिथेच थांबावी असं संतोषला वाटू लागलं. जान्हवी ही त्याच्या डोळयात हरवली होती. दोघांच्या मनात आता प्रेमाचे धागे विणले जात होते.

तेवढ्यात दार उघडल्याचा आवाज आला. त्या आवाजाने दोघेही दचकले. ऑफिसमधून अर्जुन आणि राजा बाहेर आले. अर्जुनला बाहेर येताना पाहताच दोघेही जागेवरून उभे राहिले. अर्जुन दोघांकडे न बघताच पुढे जात होता. त्याला पुढं जाताना बघत संतोष आणि जान्हवी त्याच्या बरोबर आले.

संतोष -" अरे.. काय झालं आत अर्जुन? "

अर्जुन तसाच पुढे जात होता.

जान्हवी -" आत काय झालं?"

अर्जुन मध्येच थांबला आणि दोघांकडे बघत म्हणाला.

अर्जुन -" यापुढे पोलिस त्यांच्या परीने काम करतील. आपण आपल्या पद्धतीने काम करूयात."

दोघांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह दिसत होतं.

संतोष -" पण का?"

अर्जुन -" आपण त्यांच्या पद्धतीने काम करून शकत नाही. ते खूप विचार करतात. वरच्या लोकांना त्यांना उत्तर द्यावं लागतं. "

दोघेही आता शांत उभे होते.

अर्जुन -" दा आणि दी... तुम्ही आहात ना सोबत?"

दोघांनीही डोकं हलवून होकार दर्शवला.

अर्जुन -" चला मग."

तिघेही आता स्टेशनच्या बाहेर आलेले होते.

जान्हवी -" आता कुठं जायचं?"

अर्जुन -" संतोष दाच्या घरी...."

a

संतोष आश्चर्याने त्याला बघू लागला.

संतोष -" माझ्या घरी?"

अर्जुन -" हो... काही प्रोब्लेम आहे?"

संतोष - " नाही... "

जान्हवी -" ओके..."

असं म्हणत तीने तिचे केस पुन्हा एकदा कानामागे घेतली.

तिघेही आणि राजा रिक्षामधून संतोषच्या घरी पोहचले.

अर्जुन -" संतोष दा.. आम्हाला भूक लागलीय "

संतोष -" मग??"

अर्जुन -" काहीतरी कर ना खायला.."

संतोष -" मला काही येत नाही बनवायला आणि तसंही आपल्याला ही केस लवकरात लवकर सोडवायची आहे ना?"

अर्जुन -" पहिला खाऊयात ना."

तेवढ्यात जान्हवी पुढे येत म्हणाली.

जान्हवी -" ओके... मी बनवते.. किचन कुठं आहे?"

संतोष बोट दाखवत किचन असलेली रूम दाखवली. जान्हवी किचन मध्ये गेली. ती जशी आत जात होती, तशी संतोष ची नजर तिच्यामागे जात होती.

राजा दारातच बसलेला होता. अर्जुन त्याच्यावरून हात फिरवत त्याच्याजवळच बसला होता.

थोड्यावेळात जान्हवी तीन डिश घेऊन आली. राजाला ब्रेड खायला देऊन तिघेही आता खायला बसले. सगळे काही शांतपणे चालेले होते.

खाऊन झाल्यावर संतोष म्हणाला.

संतोष -" आता या केसकडे लक्ष द्यायचं काय? का एक झोप काढायची आहे?"

संतोष आता चिडलेला होता.

अर्जुन -" संतोष दा... तुला स्टेशनचा नंबर माहिती आहे का?"

संतोष -" का?"

अर्जुन -" माहिती आहे का सांग?"

संतोष -" हो..."

a

अर्जुन -" त्याच कॉलिंग डिटेल काढू शकतोस का?"

संतोष -" कशाला?"

अर्जुन -" विसरलास का?.. त्याचा कॉल त्याचं नंबर वर आलेला होता. त्याचं लोकेशन काढण्यासाठी.."

संतोष -" तू विसरलास ते कॉलिंग डिटेल डिलीट करू शकतात."

अर्जुन -" तूच कंपनीचे सर्व्हर हॅक करून राहुलचा कॉलिंग डिटेल काढला होतास ना."

संतोष -" अरे ते खूप अवघड आहे."

अर्जुन -" अरे तू करू शकतोस हे मला माहिती आहे. हाच एक पर्याय आहे आपल्याकडे त्याचे लोकेशन काढण्यासाठी..."

संतोष थोडा वेळ विचार करून म्हणाला.

a

संतोष -" बरं... मी प्रयत्न करतो. "

संतोष लगेच त्याच्या पी. सी वर कामाला लागला. जान्हवी आणि अर्जुन दोघेही त्यालाच पाहत होते. संतोष कित्येक बटन दाबत होता. कित्येक सर्व्हररर्सचे प्रोग्राम स्क्रीनवर दिसत होते. तो खूप प्रयत्न करू लागला.

खूप सारे प्रयत्न करून शेवटी तो दीर्घ श्वास घेतला.

संतोष -" शेवटी झालंच...."

जान्हवी आणि अर्जुन त्या पी. सी च्या स्क्रीनवर बघू लागले.

अर्जुन -" हे लोकेशन कुठं आहे?"

जान्हवी -" हे लोकेशन पुणेच्या बाहेर असलेल्या जंगलात आहे. "

संतोष -" तुला कसं माहिती??"

a

जान्हवी -" मी पुणेमध्ये रहात होते. "

अर्जुन -" आपल्याला तिकडे जावं लागेल."

संतोष -" त्यासाठी आपल्याकडे गाडी हवी."

अर्जुन -" त्याच्या अगोदर आपल्याला म्हणजे तुला एक काम करावं लागेल."

संतोष -" कोणतं?"

अर्जुन -" तुझ्याकडे ती मशीन आहे का?, ज्यांनी त्यांचं लोकेशन आपल्याला कळेल?"

संतोष -" म्हणजे जी. पी. एस?"

अर्जुन -" हा... तेच मशीन."

संतोष -" नाही.. पण मी बनवू शकतो."

अर्जुन -" मग बनव आणि हा... तीन बनव."

संतोष -" का?"

अर्जुन -" तुला नंतर कळेल. "

संतोष -" ठीक आहे."

जान्हवी -" मी एक काम करते. माझ्या मित्राकडे एक फोर व्हिलर गाडी आहे. त्याच्याकडून मागून घेते. जायला सोपं होईल. "

अर्जुन -" ते चांगलं होईल."

जान्हवी लगेच तीच्या पर्से मधून मोबाईल काढून फोन लावू लागली.

अर्जुन -" संतोष दा.तुझा मोबाईल दे."

a

संतोष -" का?"

अर्जुन -" तू दे बघू पहिला. किती प्रश्न विचारतोस?"

संतोषने नाइलाजाने त्याला मोबाईल दिला आणि जी. पी. एस बनवण्यात व्यस्त झाला.

अर्जुन मोबाईल घेऊन बाहेर गेला. फोन वर कुणाशी तरी बोलला आणि परत आला.

जान्हवी सुद्धा परत आली. तेवढ्यात संतोष त्याचं काम करून मोकळं झाला होता.

जान्हवी - " गाडी खाली आली आहे. मी चावी घेऊन येते. तो पर्यंत तुम्ही तयार व्हा."

अर्जुन आणि संतोष फक्त मान हलवून होकारार्थी दर्शवली. जान्हवी खाली गेली आणि काही वेळात परत आली.

a

जान्हवी -" झाली का तयारी?"

संतोष -" हो."

अर्जुन -" नाही.. "

संतोष -" अजुन काय राहिलाय?"

अर्जुन -" राजा... तू रेडी आहेस?"

राजा भुंकुन त्याचा सुद्धा होकारार्थी दर्शवला.

अर्जुन -" आता मिशन कंप्लीट करायचं आहे."

चौघेही खाली आहे. संतोषने गाडी चालू केली आणि त्या लोकेशनच्या दिशेनी जाऊ लागले.

अर्जुन -" संतोष दा... तिथे जाण्याच्या अगोदर पोलिस हेड क्वॉटरकडे चल."

संतोष -" का?"

अर्जुन -" एक काम आहे."

संतोष अजुन काही प्रश्न विचारणार होता, पण त्याने ती टाळली. काही वेळा नंतर त्यांची गाडी पोलिस हेड क्वाटर समोर थांबली. अर्जुन खाली उतरला.

अर्जुन -" तुम्ही इथेच थांबा. मी आत जाऊन येतो."

एवढं बोलून तो गडबडीत आत गेला. संतोष, जान्हवी आणि राजा गाडीतच बसले होते. थोड्यावेळाने अर्जुन हेड क्वाटरच्या बाहेर येऊ लागला. त्याला बघून संतोष आश्चर्याने त्याला बघू लागला. कारणही तसंच होत. तो जाताना गुलाबी शर्टमध्ये गेला होता, पण येताना पांढऱ्या शर्टमध्ये आला होता.

संतोष -" तू इथे फक्त शर्ट बदलायला आला होतास?"

अर्जुन -" हो.."

संतोष मान हलवत ' काही उपयोग नाही ' असा इशारा देत गाडी चालू केला.

५ तासानंतर ते लोकेशनजवळ पोहचले. हाइवेच्या आजूबाजूला सगळीकडे जंगली झाडे होती. जान्हवी मोबाइलच्या स्क्रीनवर बघू लागली.

जान्हवी -" हे लोकेशन इथून २०० मीटर आत आहे. पण गाडी आत कसं घेऊन जाणार?"

संतोष -" आपल्याला गाडी इथेच सोडून आत जावे लागेल."

अर्जुन -" बरं.."

संतोष गाडी हाइवेच्या बाजूला थांबवला आणि सगळे खाली उतरले. चालत तिथल्याच पायवाट वरून आत जाऊ लागले. राजा काहीतरी हुंगु लागला. राजा त्याच ठिकाणी गोल फिरत होता. अर्जुन पुढे आला.

अर्जुन -" राजा.."

तो असं म्हणताच राजा एकदा भुंकला.

अर्जुन -" गो..."

त्याच आवाज ऐकताच राजा पुढे जाऊ लागला.

अर्जुन -" चला..."

राजा पुढे आणि हे तिघे त्याला पाठलाग करत होते. राजा वाट शोधत पुढे जात होता. थोड्यावेळाने ते एका मोकळ्या ठिकाणी पोहचले. तिथे एक मोठा पडीक बंगला होता. कमीत कमी ३ ऐकर मध्ये पसरलेला.... बाहेरून तर तो भुताचा बंगला वाटत होता.

जान्हवी -" हे आहे लोकेशन?"

संतोष तिच्या हातातील मोबाईलची स्क्रीनवर पाहिले.

संतोष -" हो... इथेच आहे.."

आत जाण्यासाठी एक दार त्यांना दिसलं. त्यात जाण्या अगोदर संतोषने सगळ्यांना थांबवले.

संतोष -" आपल्याला वेगवेगळं व्हावं लागेल. एकत्र आत गेल्यावर पकडले जाऊ शकतो. "

अर्जुन -" मग तू या दिशेनी जा. मी, राजा आणि दीदी या दिशेनी जा. "

संतोष -" ठीक आहे. "

अर्जुन आणि जान्हवी दोघेही आत जाऊ लागले. ते जस जसे आत जाऊ लागले, तसे त्यांना आश्चर्य वाटू लागलं होत. बाहेरून पडीक असलं तरी आतून वेगळी टेक्नॉलॉजीनी बनवलेली इन्स्ट्रुमेंट होते. एका दारातून आत गेल्यावर तिथे कित्येक लोक काम करत होते. त्यांना बघून हे दोघे एका मोठ्या बॉक्सच्या मागे लपले.

इकडे संतोषसुद्धा एका खोलीत शिरला. जिथे कोणीच नव्हतं, पण तिथे सगळी कॅमेराची स्क्रिनिंग दिसत होते. म्हणजे ती एक कंट्रोल रूमसारखी होती. त्यात त्याला जान्हवी आणि अर्जुन दोघेही दिसत होते. ते एका मोठ्या बॉक्सच्या मागे लपलेले त्याला दिसले.

असंच कुणाला न दिसता जान्हवी आणि अर्जुन पुढे जात होते. असेच पुढे जात ते एका मोठ्या त्याच लॉकर मध्ये गेले, ज्यात ऋचा आणि बाकीचे लोक होते. त्यात गुरुजी आणि इस्माईल सह अनेक लोक सुद्धा होते.

गुरुजी -" ऋचा मॅडम बहुत ही अच्छा काम किया है. इस्माईल ये तीनो मशिन्स लोड करना है. इसीलिये तुम सबको बुलावो."

इस्माईल -" हा गुरुजी. सब लोग यहा आ चुके है."

संतोष कॅमेरामधून या सर्वांना पाहत होता. तेंव्हा त्याची ट्यूब पेटली. त्यावर मोबाईल काढला आणि जान्हवीला मेसेज केला. मोबाईल वायब्रेट

झाल्यावर जान्हवीने तोच मोबाईल चेक केला. त्यात संतोषचा मेसेज होता.

संतोष -' I am in Camera room. There is nobody around me.'

जान्हवीला थोडी संधी मिळाली, तशी ती माहीती कमी आवाजात अर्जुनला सांगितली. अर्जुन वर बघू लागला, तर तिथे सी. सी. टी. वी कॅमेरा असल्याचा त्याला जाणीव झाली. अर्जुनने जान्हवीला संतोषसाठी एक मेसेज सांगितला. जान्हवीने तो मेसेज संतोषला पाठवला. संतोष मेसेज पाहू लागला.

जान्हवी - ' You have to divert their attention.'

संतोषला त्या लोकांची नजर दुसरीकडे घेऊन जायचं होतं. काय करायचं असा विचार करत तो इकडे तिकडे बघू लागला. तर तिथे त्याला एक लाल बटन दिसलं. त्यावर इमर्जन्सी असं लिहिलेलं होत. वेळ न घालवता त्याने ते बटन दाबला. दाबताच सगळीकडे मोठा असा सायरन वाजू लागला आणि त्याबरोबर लाल दिवा सुद्धा लागत होता. संतोषने हे

बघून लगेच त्या कॅमेरा रूममधून बाहेर निघाला. हे बघून त्या मोठ्याश्या लॉकरमध्ये असलेले गुरुजी आणि बाकीचे लोक इकडे तिकडे बघू लागले.

गुरुजी -" इस्माईल... देखना पडेगा क्या इमेर्जन्सी आ गया है."

इस्माईल -" हा..."

गुरुजी -" चलो... "

एवढं बोलून सगळेजण त्या लॉकर रूममधून बाहेर आले. गडबडीत गुरुजी लॉकर रूम बंद करण्यास विसरला. सगळे गेल्याचे पाहताच अर्जुन आणि जान्हवी बाहेर आले. जान्हवी थेट ऋचा जवळ गेली.

जान्हवी -" ऋचा मॅडम.. "

ऋचा तिला बघताच तिच्या मिठीत पडली आणि रडु लागली.

a

ऋचा -" जान्हवी.... तुला बघून खूप चांगलं वाटलं. राधाला ह्यांनी मारून टाकले.. काय हे हरामी लोक.."

एवढं बोलून ती परत रडु लागली. थोडा वेळ तसच रडण्यात जाणार हे माहिती असल्याने अर्जुन त्या मोठ्या अश्या तीन मशिन्स जवळ गेला आणि सोबत आणलेल्या तिन्ही जी. पी. एस त्यांना लावला आणि परत ऋचा आणि जान्हवी जवळ आला.

अर्जुन -" ऋचा मॅडम... हे काय आहेत?"

ऋचा तीच रडणं थांबवून सांगू लागली.

ऋचा -" हे अणुबॉम्ब पेक्षा घातक करणारा केमिकल बॉम्ब आहे. "

जान्हवी -" म्हणजे?"

ऋचा -" म्हणजे यांनी मोठा स्पोट तर होतोच. पण त्यांनी एक व्हायरस सगळीकडे पसरतो आणि त्यांनी सगळ्या लोकांना इजा होते. "

a

जान्हवी -" मॅडम का बनवलात तुम्ही हे?"

ऋचा -" कारण ते मला म्हणाले की मी हे बनवलं की ते मला राधा कडे घेऊन जाणार. पण नंतर कळालं की राधाला ह्या लोकांनी मारलं. "

एवढं बोलून ती परत रडु लागली. इतक्यात संतोष त्या लॉकर रूममध्ये आला.

संतोष -" चला... जावं लागणार."

अर्जुन -" असंच..."

ते ऐकून तो गप्प झाला.

अर्जुन -" मॅडम... ते हे तिन्ही बॉम्ब कुठे नेणार आहे?"

ऋचा -" ते माहिती नाही... पण त्यातला गुरुजी म्हणत होता की आता फक्त महाराष्ट्रच नाही तर महाराष्ट्राच्या गौरवाला सुद्धा हानी होणार."

अर्जुन -" महाराष्ट्राचा गौरव म्हणजे?"

इतक्यात संतोष म्हणाला.

संतोष -" म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज.."

अर्जुन आता विचार करू लागला.

अर्जुन -" प्रलय. मधला प्र म्हणजे दुसर तिसरं काहीच नसून प्रतापगड आहे.. म्हणजे हे तिन्ही बॉम्ब प्रताप गड, लातूर आणि यवतमाळ या ठिकाणी जाणार आहे. "

संतोष -" पण आपल्याला कसं कळणार की ते कुठं पोहचणार आहेत."

अर्जुन -" या तिन्ही बॉम्बला मी तु बनवलेला जी. पी. एस लावला आहे. "

संतोष -" गूड..."

अर्जुन -" मॅडम... या बॉम्बला बंद करण्यासाठी काहीतरी उपाय असेल ना.."

ऋचा -" नाही... ही तिन्ही बॉम्ब मेन इलेक्ट्रिसिटी नी चालणारे आहेत..."

अर्जुन त्या ऋच्या मॅडमचे बोलणे काळजी पूर्वक ऐकत होता.

संतोष -" मला हे कळत नाहीये की तू बॉम्ब विषयी का विचारत आहेस?... ते तर आपल्या समोरच आहेत. पोलिसांना बोलावू. ते सगळं करतील नीट."

अर्जुन -" तुला नंतर कळेल संतोष दा."

एवढं त्यांचं बोलणे चालुच होतं की इतक्यात एक आवाज आला.

इस्माईल -" hands up..."

सगळे जण घाबरून आवाजाच्या दिशेने बघु लागले, तर तिथे इस्माईलने गन त्यांच्यावर रोखून धरली होती. ते बघताच सगळ्यानी हात वर केले.

इस्माईल एका वोकी टोकी वरून म्हणाला.

इस्माईल - " गुरुजी... लॉकर रूम में मेहमान आ चुके है."

एवढं बोलून त्याने परत गन सगळ्यांवर रोखून ठेवली. थोड्यावेळाने गुरुजी सहित बाकीचे साथीदार त्या रूममध्ये आले.

गुरुजी -" आ हा... मेहमान आ चुके है. इनकी तो खातिर दारी करनी पडेगी इस्माईल."

इस्माईल हसत म्हणाला.

इस्माईल - " हा गुरुजी..."

तो इशारा देताच त्याचे साथीदार त्या सर्वांच्या जवळ जाऊ लागले. इतक्यात बाहेर लाऊडस्पिकर वरून आवाज आला.

पाटील -" मुंबई पोलिस ने तुमको चारो ओर से घेर लिया है... अपने आप को हमारे हवाले करो. "

तो आवाज ऐकताच गुरुजी चकित झाला आणि त्या सोबत संतोष पण चकित झाला की पोलिसांना कोणी बोलावलं. मग त्याला लक्षात आलं की इथे येण्याच्या अगोदर अर्जुन पोलिस हेड क्वाटर ला का गेला होता ते?

गुरुजी ला काहीतरी विचार करून म्हणाला.

गुरुजी - " इस्माईल... इन बॉम्ब को चोर के रास्तेसे लेकर जा. मुझे अकेला छोड के तुम सब जाओ."

इस्माईल -" लेकीन गुरुजी आपका क्या होगा?"

गुरुजी -" तुम मेरी फिकर मत करो "

a

इस्माईल ना इलाजाने म्हणाला.

इस्माईल -" ठीक आहे गुरुजी..."

त्याचे सगळे साथीदार हे तिन्ही बॉम्ब घेऊन चोर रस्त्याने बाहेर जाऊ लागले. इकडे गुरुजी, एक गन या सर्वांवर रोखून धरली होती. बाहेरून पाटीलची सूचना चालूच होती. अर्जुन मात्र गप्प उभा होता.

ते सगळे बॉम्ब घेऊन बाहेर गेले. थोड्यावेळाने पाटील, चव्हाण सहित बाकीचे पोलिस त्या बंगल्यात शिरले. तिथे पाहतात तर गुरुजी एकटाच गन घेऊन उभा होता आणि पुढे संतोष, जान्हवी, अर्जुन आणि ऋचा हात वर करून उभे होते.

पाटील त्याची गन काढून म्हणाला.

पाटील -" हंड्स अप... "

गुरुजी त्याच्याकडे न बघताच अर्जूनकडे बघत होता. अर्जुनसुद्धा त्याला बघत होता.

पाटील - " मैने कहा हँड्स अप."

गुरुजी एकदा पाटील कडे बघितला आणि गन चालवली. त्यातून मोठा आवाज आला.

बघतो तर काय अर्जुनाच्या छातीला ती गोळी लागली होती. गोळी लागताच तो खाली पडला. त्याला सावरताना जान्हवी, संतोष त्याला धरू लागले. त्याच्या त्या पांढऱ्या शर्टवर रक्ताचा लाल दिसू लागला.

गोळी चालताच राजाने गुरुजीवर चावा घेण्यासाठी उडी मारली. त्याच्या हातातील गन खाली पडली. तेवढ्यात पाटील जवळ येऊन गुरुजीवर गन रोखली.

ते बघून गुरुजी म्हणाला

गुरुजी -" तुम मुझे मार नहीं सकते. तुम्हारे हात कानुन से बंधे हुई है इन्स्पेक्टर.."

एवढं बोलून परत तो पाटीलची गन घेण्यासाठी झटापट करू लागला. त्याची गन तो घेऊ पाहत होता. पाटील आणि त्याची झटापट होतं असताना तो गनवर काहीतरी लावला. ती झटापट बघून चव्हाण पुढे आला आणि त्याने गुरुजीला धरले.

जान्हवी अर्जुनला चेक केले तर त्याचा श्वास चालत नव्हता. राजा त्याला हुंगत होता

जान्हवी जोरात म्हणाली.

जान्हवी -" अंबुलेन्स ला बोलवा.."

चव्हाण गडबडीत अंबुलेन्सला फोन लावला. गुरुजीला बांधून अरेस्ट करण्यात आलं. तरीही तो हसत होता.

गुरुजी -" अब क्या करेगा?.. बॉम्ब तो चले गये. ये बच्चा भी गया... अब क्या करेगा इन्स्पेक्टर??"

ते बघून पाटील खरंच विचार करू लागला. अंबुलेन्स चे कर्मचारी आले आणि अर्जुनला घेऊन जाऊ लागले. राजा अर्जुनला हुंगत त्याच्यासोबत जाऊ लागला.

अर्जुन हालचाल करत नव्हता. अंबुलेन्सची मागील दार बंद झाली आणि तिथून निघून गेली. संतोष, जान्हवी आणि ऋचा पाटीलकडे आले.

जान्हवी -" सर... अर्जुनचा श्वास थांबलेला वाटत होता "

ती अगदी उदासपणे म्हणत होती. पाटील अजुन विचार करत होता.

संतोष -" सर.. काय विचार करताय?"

पाटील -" हेच की आता काय करायचं? याला तर अरेस्ट केलो. पण बॉम्ब तर गेले."

संतोष -" सर... अर्जुन जाण्याआधी सगळी व्यवस्था करून गेला होता. तो मला म्हणाला होता की जी.पी. एस यंत्र बनव. मी तीन यंत्र तयार केले. नंतर मला कळाले की अर्जुन ते यंत्र या तिन्ही बॉम्बला लावले आहे. म्हणजे आपल्याला त्या तिन्ही बॉम्बची लोकेशन कळेल."

पाटील -" मग ते कसं कळेल?"

संतोष -" माझ्या मोबाईलच्या स्क्रीनवर दिसेल."

पाटील -" अर्जुन नसता तर या केसच काय झालं असतं कुणास ठाऊक?"

सगळे उदास होऊन तिथेच उभे होते. तेवढ्यात चव्हाण तिथे आला.

चव्हाण -" साहेब... हेड क्वॉटरला जावे लागेल.

पाटील -" हो... संतोष तू पण चल. लोकेशन तुझ्याकडे येणार आहेत."

तेवढ्यात जान्हवी पुढे येऊन म्हणाली.

जान्हवी -" सर... मी पण येते. "

a

संतोष काळजीपोटी तिला म्हणतो.

संतोष -" तू कशाला?... "

जान्हवी -" सर... ती बॉम्ब व्हायरस युक्त आहे. त्यासाठी तुम्ही मला घेऊन जावं लागेल."

ऋचा -" हा सर...हिला घेऊन जा. "

पाटील -" बरं... चल तू पण."

सगळे त्या पडीक बंगल्यातून बाहेर आले. पोलीस जीपमध्ये पुढे गुरुजी आणि बाकीचे कॉन्स्टेबल होते आणि मागच्या जीपमध्ये हे सगळे होते.

काही तासानंतर ते हेड कॉटरला पोहचले. इतर कॉन्स्टेबल त्याला घेऊन आत गेले. बाकी सगळे कमिशनर ऑफिसला गेले. पाटील ऑफिसमध्ये पोहचताच त्याने कमीशनरला एक सल्यूट मारला.

a

कमिशनर -" गुड जॉब पाटील.. मला कळाले कि अर्जुनला गोळी लागली."

पाटील -" हो."

कमिशनर -" कसं आहे तो?"

पाटील खाली बघत होता. जान्हवी पुढे येऊन म्हणाली.

जान्हवी -" सर... तो श्वास घेत नव्हता. "

कमिशनर त्याची टोपी काढला.

कमिशनर -" त्याला ( गुरुजी) इथे आणलाय का?"

पाटील - " हो सर..."

कमिशनर -" मग चला मग."

a

सगळे ऑफिसमधून बाहेर आले. ते चौकशी खोलीत गेले. तिथे काही कॉन्स्टेबल गुरूजीला मारत होते. तरी तो काहीच बोलत नव्हता. अर्धा तास तसाच गेल्यानंतरही, तो काहीच बोलला नाही. शेवटी सगळे कॉन्स्टेबल थकले. ते बघून कमिशनर म्हणाले.

कमिशनर - " ते बॉम्बच्या लोकेशन माहिती आहे ना."

पाटील -" हो सर... "

कमिशनर -" बरं... याला नागपूरच्या जेलमध्ये न्या. त्या अगोदर याचे कपडे काढून चेक करा की काय आहे का? आणि त्यानंतर त्या लोकेशन्स कडे वळूयात."

पाटील - " सर..."

असं म्हणत पाटील सल्युट मारला. कमिशनर त्यांच्या ऑफिसमध्ये गेले. तसे कॉन्स्टेबल गुरुजीला चेक करू लागले.

पाटील -" संतोष लोकेशन काय आहे?"

संतोष त्याचा मोबाईल बघून म्हणाला.

संतोष -" सर... ते लातूर, यवतमाळ आणि प्रतागडाच्या दिशेनी जात आहे. "

पाटील - " बर.. ऋचा मॅडम तुम्ही घरी जा. "

ऋचा -" पण सर..."

ती वाक्य पूर्ण करणारच होती तेवढ्यात जान्हवी म्हणाली.

जान्हवी -" हा मॅडम... मी आहे ना यांच्यासोबत.. तुम्ही घरी जा."

ऋचा - " ठीक आहे. "

चव्हाण पाटील जवळ येऊन म्हणाला.

चव्हाण -" साहेब... त्याच्याकडे काहीच नाहीये. निघायचं का?"

पाटील - " हो... बसवा त्याला आणि चला. संतोष आणि जान्हवी तुम्ही माझ्या जीपमध्ये चला."

दोघेही मान हलवत होकारार्थी दिले. काही कॉन्स्टेबल त्याला हतकडी लावून बाहेर आले. जान्हवी, पाटील, संतोष, चव्हाण आणि आणखी दोन कॉन्स्टेबल एका जीपमध्ये बसले. बाकी दोन जीपमध्ये इतर कॉन्स्टेबल आणि गुरुजी हे बसले. पाटीलची जीप आधी, मधील जीपमध्ये गुरुजी आणि इतर कॉन्स्टेबल आणि शेवटच्या जीपमध्ये बॅकअप कॉन्स्टेबल होते. हे तीन जीपमध्ये नागपूरच्या जेलच्या दिशेने नागपूरला जाऊ लागले.

एका मोठ्या रस्त्यावर ते जात होते. इतर कोणतेही वाहतुकीची गर्दी नव्हती आणि हे सगळे तिथून जाणार होते म्हणून इतर रस्ते देखील मोकळे केलेले होते. असेच पुढे जाताना एक मोठा रस्ता लागला. जिथे आजूबाजूला जंगली झाडे होते. जीप तिथून जात असताना अचानक त्या जंगली झाडातून गोळी चालू लागली. एक नव्हे, दोन नव्हे कित्येक बंदूक चालण्याचा आवाज येऊ लागला. जीपच्या काचा तुटू लागल्या. अश्या परिस्थितीत पुढील जीप थांबली. ते बघून मागील दोन्ही जीप पण

थांबल्या. सतत गोळीची बरसात होतं होती. कुठून गोळी चालत होतं ते सुद्धा कळत नव्हतं.

पाटील आणि चव्हाण बाहेर आले आणि गोळी ज्या दिशेतून येत होते तिथे त्यांचे बंदूक चालवू लागले. मागचे कॉन्स्टेबल ही बाहेर आले आणि गोळी चालवू लागले. गुरुजी जीपमध्ये एक मोठीशी स्माइल करत बसला होता. बाकीचे कॉन्स्टेबलही बंदूक चालवू लागले.

पाटीलनी निरखून पाहिला तर तिथे खुपजण काळे कपडे घालून बंदूक चालवत होते. पाटीलला बंदूक चालवायला चान्सच मिळत नव्हता. संतोष आणि जान्हवी जीपमध्ये लपून होते. काचे आणि जीपची बाकीचे हिस्से फुटत होते. दोन कॉन्स्टेबलना गोळी लागली. पाटील कसंतरी करून त्याचा मोबाईल घेतला आणि कमिशनरला फोन लावला.

कमिशनर -" हॅलो पाटील."

पाटील गडबडीत म्हणाला.

पाटील - " सर... इथे फायरींग होतं आहे."

कमिशनर त्यांच्या खुर्चीवरून उठून म्हणाले.

कमिशनर -" काय?"

पाटील -" हो सर... माहिती नाही कसं? पण इथे रस्त्यावर कोणीतरी आमच्यावर फायरिंग करत आहेत आणि सर दोन कॉन्स्टेबल जखमी झाले आहेत."

कमिशनर लगेच निर्णय घ्यायचा होता. म्हणून ते म्हणाले.

कमिशनर -" पाटील... तुम्ही लगेच मागे फिरा. जवळच्या पोलिस स्टेशनला जा आणि तिथे आणखी बॅक अप घेऊन परत हेड कॉटरला या आणि हा जखमी झालेल्यांना तिथेच हॉस्पिटलला पाठवा."

पाटील -" पण सर..."

कमिशनर -" पाटील.. आपल्याकडे वेळ नाहीये. मागे फिरा..."

a

पाटील -" ओके सर..."

पाटील व्होकी टोकी ने मागच्या सगळयांना त्याचा आदेश कळवला. बाकीचे कॉन्स्टेबल कसतरी वाट काढून त्यांच्या जीपमध्ये बसले. गुरुजी अजुन त्याच जीपमध्ये होता. गोळीची बरसात अजुन चालुच होती. जीप रिव्हर्स घेतली. त्यांनासुद्धा माहिती नव्हतं की ते किती गतीने जात होते. रिव्हर्स घेऊन ते परत मागच्या रस्त्याला लागले.

लवकरच ते जवळच्या पोलिस स्टेशनला पोहचले. तिथल्या इन्स्पेक्टरला आधीची सगळी माहिती देऊन तिथले कॉन्स्टेबल बॅक अप म्हणून सोबत घेतले. जखमी झालेल्या कॉन्स्टेबलना तिथूनच हॉस्पिटलला पाठवले. आता बॅकअप जास्त घेऊन ते मागे फिरू लागले. चार दुसरे जीप घेऊन ते परत मागच्या रस्त्याला लागले. गुरुजीच्या चेहऱ्यावर अजुन स्मित होती. काहीतरी गडबड आहे असं पाटीलला वाटलं म्हणून या वेळेस गुरुजीला ते त्यांच्या जीपमध्ये बसवले.

परत जात असताना त्यांना एक हायवे लागणार होता. त्यामुळे मागचे जीपमधले आणि पुढे पाटील सगळीकडे लक्ष देऊन होते.

a

अगदी शांत अश्या रस्त्यावर ते जात होते. इतक्यात आकाशात तीन हेलिकॉप्टर त्यांना दिसले. त्यांना आधी वाटलं कुठलेतरी डिफेन्सचे लोक असतील, त्यामुळे त्यानी त्या कडे लक्ष दिले नाही. पण जेंव्हा त्या हेलिकॉप्टर मधून गोळ्या चालू लागल्या, मग त्यांना कळालं की हे तर वेगळेच लोक आहेत.

पहिल्यांदा जंगलातून आणि आता हेलिकॉप्टरवरून गोळ्या चालत होत्या. परत काचा फुटू लागल्या. जीपमध्ये गुरुजी मोठिशी स्माइल करत होता. जान्हवी आणि संतोष जीपमध्ये खाली बघून बसले होते. गोळ्या वरून चालत असल्यामुळे त्यांना खूप अवघड होतं होते. मागच्या जीपमधून बाकीचे बॅक अप टीमही उतरले आणि वर गोळ्या चालवू लागले. पण त्यांच्याकडे अडवान्स बंदूक होते म्हणून पोलिसांची बाजू कमजोर पडत होती. तसे असतानाही बंदूक चालवत होते. वरून तरी गोळ्यांचा पाऊस पडत होता.

एवढ्यात तीन हेलिकॉप्टर पैकी एक खाली उतरू लागले. खाली उतरताच त्यातून ६ जण बाहेर आले आणि बंदूक चालवू लागले. बाकीचे दोन हेलिकॉप्टर वरूनच गोळ्या चालवत होत्या. ते ६ जण गुरुजीच्या

a

जिपजवळ आले. पाटील गोळ्या चालवत मागे जात होते आणि चव्हाणही त्याच्यासोबत होता. जीपमध्ये फक्त जान्हवी, संतोष आणि गुरुजी राहिले होते.

ते ६ जण जवळ आल्यावर जीपची दार उघडली आणि जान्हवीला बाहेर ओढून काढले. जान्हवीला पडताना बघताच संतोष त्यांना मारायला गेला. पण ते बंदुकनी त्याच्या डोक्याला मारले. तो तिथेच बेशुध्द पडला. गुरूजीला बाहेर काढून ते ६ जण परत हेलिकॉप्टरकडे गेले. पाटील तरीही त्यांच्यावर गोळ्या चालवत होता. मागे माहिती नाही किती कॉन्स्टेबल जखमी झाले होते. पण पाटील गोळ्या चालवत होता. हेलिकॉप्टरमध्ये ते सगळे बसले आणि थोड्याचवेळात हेलिकॉप्टर उडू लागली. ते उडताना बघताच बाकीचे हेलिकॉप्टरमधून गोळ्या थांबल्या. वर हेलिकॉप्टर पोहचताच पाटील आणि चव्हाण जान्हवीकडे आले.

पाटील -" मला हे कळत नाहीये की त्यांना आपलं लोकेशन कसं भेटत आहे?"

हा प्रश्न म्हणताच पाटीलचा फोन वाजला. स्क्रीनवर नंबर वेगळाच होता.

पाटील - " हॅलो.."

गुरुजी -" क्या साहेब.मुझे एक दीन भी रख नही सके. "

पाटिलला लगेच कळाल की हा गुरुजी आहे. हेलिकॉप्टर मधून बोलत आहे.

पाटील -" तू बच नही सकेगा."

गुरुजी -" कुछ अलग बोलो साहेब... अभी तो तुम्हारे हाथोसे भाग आया हुं.. "

पाटील रागात होता.

गुरुजी -" सोच रहे हो ना की मेरी लोकेशन मेरे लोगो को कैसे मिली?"

पाटील गप्प होता.

गुरुजी -" जरा अपनी गन देखना इन्स्पेक्टर.."

एवढं म्हणताच पाटील त्याच्या गन बघितला. त्याला एक चीप लागलेली होती. जे गुरुजीनी त्यांच्या अड्यावर पाटीलसोबतच्या झटापटीत लावलेला होता. ते बघून पाटीलला अजुन राग आला.

गुरुजी हसत होता.

गुरुजी -" थेंक यू इन्स्पेक्टर. मेरी मदत करने के लिये... और हा प्रलय आणेवाला है. "

एवढं बोलून तो फोन कट केला आणि वरून मोबाईल खाली फेकला.

सगळे जण स्तब्ध होते. बॉम्ब त्यांच्या लोकेशनकडे जात होती. गुरुजी फरार झाला होता. पाटील विचार करत असाच बसलेला होता. संतोष खाली बेशुध्द पडला होता. त्याला उठवत जान्हवी खाली बसलेली होती.

a

**पोलीस हेड क्वाटर -**

कमिशनरच्या ऑफिसमध्ये पाटील, चव्हाण, संतोष आणि जान्हवी उपस्थित होते. कमिशनर फोनवर बोलणं संपवून फोन ठेवला.

कमिशनर -" पाटील... काय करून ठेवलात हे? वरून आता फोन येऊ लागले आहेत. "

पाटील -" सर.. तिथली परिस्तिथीच तसली होती. आम्ही काही करूच शकत नव्हतो."

कमिशनर -" पाटील... तुम्ही एक इन्स्पेक्टर आहात. असेल फालतू रीजन्स सांगू नका. "

पाटील -" पण सर... "

पाटील वाक्य पूर्ण करणारच होता की कमिशनर त्याला थांबवले.

कमिशनर -" आता तो फरार झालाय. आता कुठे शोधायचं त्याला?"

संतोष -" पण सर... बॉम्बची लोकेशन माहितीच आहे ना."

कमिशनर - " ती एकच तर आशा उरलाय."

जान्हवी -" सर.. तीन बॉम्ब आहेत. म्हणजे तीन टीम आपल्याकडे हवे. "

कमिशनर -" त्याची चिंता सोडा. ते अगोदरच करून ठेवली आहे. पण त्यांना बॉम्बची लोकेशन कसं सांगणार?"

संतोष -" सर... इथून मी स्क्रीन शेअर करू शकतो. "

कमिशनर -" हे चांगलं होईल. पाटील.."

पाटील -" येस सर.. "

कमिशनर -" तुम्हाला काय वाटतं तो गुरुजी कुठल्या बॉम्ब जवळ असेल?"

पाटील -" सर... "

पाटील विचार करतच होता की जान्हवी पुढे येऊन म्हणाली.

जान्हवी -" प्रताप गड..."

संतोष -" तुला कसं माहिती?"

जान्हवी -" तुला आठवत नाही. ऋचा मॅडम म्हणत होत्या की गुरुजी म्हणाला ' मुझे महाराष्ट्र को ही नहीं. महाराष्ट्र की शान को उडाना है. ' आणि महाराष्ट्राची शान म्हणजे.."

संतोष लगेच म्हणाला.

संतोष -" छत्रपती शिवाजी महाराज... म्हणजे तो प्रताप गडावर असेल."

कमिशनर -" मग ठरलं... पाटील तू आणि तुझी टीम प्रतागडावर जायचं. "

पाटील -" येस सर..."

कमिशनर -" आणि हा... या वेळेस कुठलाही प्रोब्लेम मला नकोय.."

पाटील -" या वेळेस कोणतीही चुकी नाही होणार सर."

कमिशनर -" ठीक आहे. तीन टीम बनलेली आहे. पाटील तुम्ही तुमची टीम प्लॅनिंग करून गडाकडे निघा. आणि हा तुम्ही तिन्ही टीम कॉन्टॅक्ट मध्ये रहा. मला प्रत्येक क्षणाची रिपोर्ट मिळायला हवं."

पाटील -" तुम्ही काळजी करू नका सर... सगळे रेडी करून पटकन आम्ही निघतो. "

कमिशनर -" ठीक आहे. "

a

पाटील -" जय हिंद सर."

सल्यूट करून तो जाण्याची परवानगी मागितला.

कमिशनर -" जय हिंद."

सगळे त्या ऑफिसमधून बाहेर आले. पाटील लगेच आपली टीमची यादी बनवण्यात बिझी झाला. संतोष आणि जान्हवी तिन्ही बॉम्बच्या लोकेशनची स्क्रीन शेअर करण्यात बिझी झाले.

काही तासानंतर तिन्ही टीम आणि संतोष, जान्हवी हेड क्वाटरला जमा झाले. सगळ्या टीमला आदेश देण्याकरता कमिशनर सगळ्यासमोर होते.

कमिशनर - " ओल टीम्स रेडी?"

सगळे एका आवाजात म्हणाले," येस सर."

a

सगळीकडे तो आवाज घुमत होता. त्या आवाजाने माहिती होतं असतं की त्यांच्यात किती जोश होता?

कमिशनर -" आज आपली खरी परीक्षा आहे. खूप काही तुमच्यावर डीपेंड आहे. जर हे मिशन फेल झालं. तर पूर्ण महाराष्ट्राच नाही तर पूर्ण देशाला परिणाम भोगावे लागतील. तुम्ही हे होऊ देणार का?"

सगळे परत एका आवाजात म्हणाले, " नो सर..."

कमिशनर -" ओके... संतोष लॉकेशनची शेअरिंग झाली?"

संतोष -" हो सर... तिन्ही टीमसाठी शेअरिंग झालीय. "

कमिशनर - " सगळे मिशन झाल्यावर भेटू. टीम लीडर तयार रहा."

सगळे मोठ्या आवाजात म्हणाले, " येस सर..."

कमिशनर - " चला... ऑल दि बेस्ट."

सगळे जाण्याची तयारी करू लागले. बंदूक, त्याला लागणारी गोळी आणि बाकीचे बुलेट प्रुफ जॅकेट घालून तयार होते. तिन्ही टीम जाण्यासाठी तयार होते. शेवटची तयारी बघून ते सगळे आपापल्या ठिकाणी निघाले.

जान्हवी, संतोष, चव्हाण आणि पाटील एका टीममध्ये होते. ते त्यांच्या टीमसोबत प्रतागडाकडे निघाले. बरीचशी रात्र झालेली होती. पण वेळ कमी होता. म्हणून ते लगबगीने रात्रीच निघाले. बाहेर थंडी वाढत होती.

संतोष आणि जान्हवी जवळच बसले होते. रात्र खूप झाली होती आणि थंडी मुळे जान्हवीला थंडी वाजू लागली होती आणि दिवसभर थकल्याने ती आखडून झोपली होती. ते बघताच संतोष त्याच्याजवळची जॅकेट तिला घातला. तिला थोडी ऊब मिळू लागली. झोपेत ती संतोषच्या खांद्यावर आली. तीच स्पर्श त्याच्या अंगात नवी स्पंदने निर्माण करत होती. तिच्या बॉब कट केलेली केस त्याच्या तोंडावर येत होती. ती झोपेत खूप क्यूट दिसत होती. तिच्या तोंडावरून त्याच लक्ष भरकटत नव्हती. त्याच्या मनात तिच्याविषयी वेगळीच भावना निर्माण झालेली होती. तिला बघून तो विचार करू लागला. ' ही एकटी राहते, पण किती धेर्याने काम करते. आज ती आमच्यासोबत काही विचार न करता आली. काय पण

a

हो.. हिला मी वाचवणारच.. माझं जीव सुद्धा गेलं तरी चालेल.' तो तिच्या विचारात मग्न झालेला होता. विचार करताना त्याला सुद्धा झोप लागली. तिच्या डोक्यावर तो अलगद डोकं ठेवून झोपी गेला.

सकाळची कोवळी ऊन संतोषच्या तोंडावर पडत होती. तो लगेच जागा झाला. जागा होताच बघतो तर बाकीचे पोलिस नाश्ता करत होते. त्याला जरा वेगळच वाटलं. तो आजूबाजूला बघतच होता. इतक्यात जान्हवी म्हणाली.

जान्हवी - " गूड मॉर्निंग."

तिच्या हातात एक चहाची कप घेऊन आलेली होती. ती त्याला देत म्हणत होती.

संतोष ते बघून चिडत म्हणाला.

संतोष -" तुला वाटतं का काही तरी?.. इथे मिशनवर आलो आहोत. ट्रीप साठी नाही.. "

तो तसा बोलल्याने ती उदास पणे जीपच्या बाहेर आली. तो सुध्दा चिडत बाहेर आला आणि पाटील जवळ जाऊन म्हणाला.

संतोष -"सर... ही वेळ नाश्ता करायची नाहीये. तिथे बॉम्ब आहे आणि आपण इथे नाश्ता करत बसलोय."

पाटील शांतपणे म्हणाला.

पाटील -" संतोष.. शांत हो... काल कुणीच काहीही खालेले नव्हते आणि न खाता कोणताही मिशन सक्सेस होतं नाही."

हे त्यालाही पटलं. तो सुध्दा काहीतरी खाण्यासाठी घेऊन जान्हवी जवळ आला. जान्हवी उदास होऊन बसलेली होती. तो तिला बघून म्हणाला.

संतोष - " सॉरी... जरा जास्तच बोललो मी.."

जान्हवी - " इट्स ओके..."

अस म्हणत ती सुद्धा खाऊ लागली.

जान्हवी -" थेंक्स.."

संतोष -" का?"

जान्हवी -" कालच्या जॅकेट मुळे..."

तो लाजत म्हणाला.

संतोष -" इट्स ओके.."

मग दोघेही हसत नाश्ता करू लागले.

सगळं काही आटपून त्यांनी परत पुढचा रस्ता पकडला. मोठा प्रवास करून ते सगळे गडाच्या पायथ्याशी आले. सगळीकडे झाडीच होती. आधीच अख्खा गड रिकामा केलेला होता. सगळी तयारी करून पाटील आणि बाकीचे सगळे आत शिरले.

पाटील -" अर्धे जण उत्तरेकडे जा आणि बाकी सगळे माझ्यासोबत चला आणि कॉन्टॅक्ट मध्ये रहा."

हे आदेश मिळताच सगळे वेगळे झाले.

पाटील -" संतोष.. बॉम्ब ची लोकेशन कुठे आहे. "

संतोष - " सर... ५०० मीटरवर आहे."

पाटील -" ठीक आहे... सगळे पटकन चला "

पाटील गन काढून पुढे जाऊ लागला. त्याच्यासोबत सगळे गन काढून पुढे चालू लागले. जान्हवी आणि संतोष त्याच्या मागे जात होते.

पाटील उत्तरेकडे गेलेली टीमला कॉन्टॅक्ट करून विचारला.

पाटील - " काही मिळालं का?"

a

तिथले हवालदार -" नाही सर.."

पाटील -" काही मिळालं तर ताबडतोब कळवा."

तो -" येस सर.."

पाटील -" काहीतरी गडबड वाटत आहे. "

संतोष -" म्हणजे?"

पाटील -" इथे तर कोणीही दिसत नाहीये."

संतोष - " मग आता काय करायचं?"

पाटील थोडा विचार करत म्हणाला.

पाटील -" आपल्या टीम पैकी अर्धे इथेच थांबा आणि बाकी सगळे माझ्यासोबत या. संतोष आणि जान्हवी तुम्हीही सोबत या."

पाटील, चव्हाण, संतोष, जान्हवी बाकी ८ हवालदार गडाच्या पायथ्याशी जाऊ लागले.

पायथ्याशी पोहचल्यावर ते शोधू लागले.

संतोष -" सर... इथून ३०० मीटर सांगत आहे."

पाटील -" इथेच असेल."

सगळे शोधू लागले. पुढे जाताच त्यांना एक पडीक असं मोठ घर दिसल. ते बघून पाटील लगेच सावधान झाले.

पाटील - " सगळे तयार रहा. तिथे खूप जण असू शकतात. तयार रहा. "

सगळे तयार होऊन पुढे जाऊ लागले. तिथे खूप झाडी होती. सगळे सावधपणे आत शिरले. इतक्यात इतक्यात चारी बाजूने एक प्रकारचं कसलीतरी वस्तू त्यांच्याजवळ येऊ पडली. सगळे सावध झाले.

a

काहिक्षण सगळे स्तब्ध होऊन त्याला बघू लागले. इतक्यात त्यातून धूर निघू लागला. त्यांना काही कळतच नव्हतं की काय चालू आहे. धूर सगळीकडे पसरू लागला होता. आलेल्यांपैकी काही जण बेशुध्द होऊन पडत होते. जान्हवी ही थोड्यावेळात खाली पडली. तिला खाली पडताना पाहताच संतोष तिला उचलण्याच्या प्रयत्नात खाली बसला. तिला हलवून उठवण्याचा प्रयत्न करू लागला. पण काही क्षणात तो ही बेशुध्द झाला. पाटील आणि चव्हाण ही त्यांच्या तंद्रीत नव्हते. ते सुद्धा बेशुध्द होऊन खाली पडले.

थोड्यावेळाने जान्हवीचे डोळे उघडू लागले. ती शुध्दीवर आली. आजूबाजूला बघितल्यावर पाटील, चव्हाण, संतोष आणि बाकी सगळे हवालदार यांचे हात मागील बाजूस बांधून ठेवले होते. तिचे सुद्धा हात मागील बाजूस बांधलेले होते. जान्हवीच्या जवळ संतोष खाली पडला होता. त्याला बघून जान्हवी हाक मारू लागली.

जान्हवी -" संतोष.. संतोष..."

तीच आवाज ऐकताच संतोष डोळे उघडला. शुध्दीवर आल्यानंतर त्याला एक क्षण काही कळालेच नाही की तो कुठे आहे? आणि काय चाललय? जान्हवीकडे बघताच त्याने उठण्याचा प्रयत्न केला.

संतोष -" जान्हवी... "

एवढं म्हणत तो हातातली रस्सी काढण्याचा निष्फळ प्रयत्न करू लागला. पाटील, चव्हाण आणि बाकीचे हवालदार खालीच बेशुध्द होते.

काहीकाळ तसेच गेल्यावर त्यांनाही शुद्धी येऊ लागली. तंद्रीत आल्यावर ते पुढे बघतात तर तोच मोठीशी मशीन म्हणजेच बॉम्ब चालू अवस्थेत त्यांना दिसली. त्यात एक स्क्रीन त्यांना दिसू लागली. ज्यात वेळ उलटी जात होती. अजुन १० मिनट त्यात दाखवत होत. पाटील आणि बाकीचे त्यांचे हात सोडवण्याचा प्रयत्न करू लागले. त्यांना काही यश मिळण्याचा संकेत दिसत नव्हता.

इतक्यात कुठून तरी आवाज आला.

गुरुजी -" क्या इन्स्पेक्टर?.. फस गये ना आके?"

असं आवाज येताच काही जण तोंडावर मास्क घातलेले, त्यांच्या जवळ आले आणि त्यांच्या डोक्यावर बंदूक ठेवले. पुढून दोघे मास्क घालून पुढे आले.

गुरुजी हसतच त्याच्या तोंडावरच मास्क काढला आणि बाजूच्या इस्माईलकडे दिला. इस्माईल ही त्याच्या तोंडावरचा मास्क काढला आणि त्याच्याही तोंडावर वैरी स्मितहास्य होते.

गुरुजी - " इन्स्पेक्टर... फिर से मिलके मुझे बहुत खुशी हुई.."

पाटील रागात त्याच्याकडे बघत होता. त्याची गन पुढे असलेल्या टेबलावर त्याला दिसत होती. त्याच्या मनात ती गन कसं तरी घ्यावी यासाठी प्लॅन करू लागला होता.

पाटील -" अबे... तू तो डरपोक निकला."

गुरुजी -" मै और डरपोक??"

a

एवढं म्हणत तो हसू लागला.

गुरुजी -" कैसे?"

पाटील -" तेरे पास इतने आदमी है, फिर भी तूने मेरा हात बांधा हुआ है."

गुरुजी ते ऐकताच शांत झाला.

पाटील -" क्यू बे?.. अब बोलती बंद हुई तेरी?"

गुरुजी -" इन्स्पेक्टर... तू मेरा कुछ नहीं बिघाड सकता है."

पाटीलचा प्लॅन होता की त्याच्याकडून कसातरी त्याचा हात खोलवून घ्यावे आणि ती पुढील गन घेऊन ते बॉम्ब उध्वस्त करावे.

पाटील एवढ्यात हसू लागला.

a

पाटील -" ऐसे तू मानता है, लेकीन जाणता नहीं है. इसिलिये तुने मुझे बांध के रखा है. हिम्मत है तो मुझे खोल के दिखा."

हे ऐकून गुरुजींचा अहंकाराला ठेच पोचली. त्याला राग येऊ लागला होता. त्याला बघून इस्माईल पुढे येऊन म्हणाला.

इस्माईल - " नहीं गुरुजी... तुझे वो भडका रहा है. मत खोल."

गुरुजी रागात येऊन म्हणाला.

गुरुजी -" चिंता मत कर इस्माईल... सिर्फ ९ मिनट और बस.. फिर बॉम्ब ब्लास्ट होगा. "

एवढं म्हणत तो पुढे आला आणि मोठ्यांनी म्हणाला.

गुरुजी -" खोलो इसे.. देखते है कितना दम है. और हा, कोई भी हमारे बीच नही आयेगा."

त्यातला एक पाटीलचा हात सोडवला. पाटील उभा राहिला. उभा होताच तो गुरुजीवर धावत गेला. जाताच त्याच्यावर मुक्केचे पाऊस पाडू लागला. त्यातले काही त्याला लागत होते, तर काही तो चुकवत होता. वेळ मिळताच तो ही पाटीलला मारू लागला. कधी दोघांच्या पोटात मुक्के पडायचे, तर कधी तोंडावर लाथ पडायची. गुरुजीही खूप ताकदीने त्याला मारत होता. बाकीचे त्या दोघांचे मारामारी बघत होते. कधी गुरुजी खाली पडत होता, तर कधी पाटील खाली पडत होता. पण दोघांपैकी कोणीच हार मानत नव्हते. वेळ ही खूप कमी राहिलेला होता.

पाटील वेळ बघताच पुढील टेबलाजवळ गेला. गुरुजीच्या पोटात तो लाथ घालून दूर केला आणि टेबलावरील त्याची गन घेतला आणि गुरुजींच्या दिशेनी तो धरली.

गुरुजी ते बघताच थांबला. त्याच्याकडे बाकीचे लोक ही बघू लागले.

पाटील -" चल... "

a

एवढं म्हणत तो गुरुजी च्या डोक्यावर गन ठेवली आणि पुढे सरकू लागला.

हे बघतच इस्माईल त्याची गन काढला आणि पाटीलच्या पायावर गोळी मारला. गोळी लागतच तो खाली पडला. पडताच वेदनेने तो ओरडू लागला.

गुरुजी -" एक बार तो मुझे लगा की मै हार गया. लेकीन नहीं मै अभी जितुंगा... "

एवढं बोलत तो हसत बॉम्बकडे जाऊ लागला. आत फक्त ३० सेकंद बाकी होते. खाली पडलेला पाटील ही हसत म्हणाला.

पाटील - " तू कभी जीत नहीं सकता साले. तुझे अभी पता नहीं है. तुझे बाद में समझ आयेगा."

हे वाक्य गुरुजींचं लक्ष वेधून घेतलं. एवढंच नाही तर संतोषचेही लक्ष वेधून घेतलं. तो विचार करू लागला.

a

संतोष -" काही तरी गडबड आहे. "

ते ऐकताच तिच्या जवळची जान्हवी म्हणाली.

जान्हवी -" काय?"

संतोष -" कसलीतरी गडबड आहे?"

जान्हवी -" कसली गडबड?"

संतोष -" हे बघ जेंव्हा अर्जुनला गोळी लागली. तेंव्हा बाहेर असलेली अंबुलेन्स लगेच आत आली. म्हणजे अगोदरच अंबुलेन्स बाहेर होती. कसे काय?"

जान्हवीला हे पटलं.

संतोष - " आणि हा.. त्याच्या छातीवरून रक्त बाहेर येत होती. पण गोळी ज्यातून बाहेर येते तिथून रक्त स्त्राव होतं असतो. "

a

जान्हवी -" होय.. म्हणजे काय?"

गुरुजी पुन्हा म्हणू लागला.

गुरुजी -" अभी क्या फरक पडता है. ३० सेकंद में पुरा महाराष्ट्र चपेट मे आयेगा. "

१० सेकंद उरले. ९.... ८... ७.... ६...

एवढ्यात लाईट गेली आणि बॉम्ब बंद पडली. हे बघून गूरूजीला आश्चर्य वाटलं. तो त्या बॉम्बकडे नीट तपासू लागला. गुरुजी गडबडीत म्हणाला.

गुरुजी -" इस्माईल... इसको क्या हुआ?"

इस्माईल ने पण बॉम्बला तपासला.

इस्माईल -" पता नहीं गुरुजी."

a

गुरुजी -" बाकी के बॉम्ब के बारे में क्या अपडेट है?"

इस्माईल बाकीच्या लोकेशनकडे बघितला. तो निराशेने म्हणाला.

इस्माईल -" वो भी नहीं फटे गुरुजी..."

गुरुजी रागात येऊन म्हणाला.

गुरुजी -" क्या हुवा इसे?"

इतक्यात भुंकण्याचा आवाज घुमु लागला. पूर्ण त्या मोठ्याश्या पडीक घरात सगळीकडे घुमू लागला. बाहेरून दोन आकृती आत येताना दिसू लागल्या. जसे आत येत होते तसे ती आकृती स्पष्ट होतं होती. पुढे येताच लक्षात आले की हे दुसर तिसरं कोणी नसुन हे तर राजा आणि अर्जुन होते. त्यांना बघताच जान्हवीच्या तोंडून निघालं.

जान्हवी -" अर्जुन... तू जिवंत आहेस?"

संतोष -" मला वाटलंच...."

अर्जुन त्यांना बघून फक्त स्मित केला. पुढे येताच त्याने पाटीलला उचला आणि गुरुजीकडे पाहून म्हणाला.

अर्जुन -" क्या गुरुजी मुझे देखके खुशी नहीं हुई क्या?"

गुरुजी चकित झाला होता, पण तो काही तोंडावर दाखवत नव्हता.

गुरुजी -" तू जिंदा है... लेकीन कैसे?"

अर्जुन हसत म्हणाला.

अर्जुन -" तुझे क्या लगता है? ये सब तेरे प्लॅन से चल रहा था. नहीं.. ये सब मेरे प्लॅन से चल रहा था और ये प्लॅन पहिलेही बना था. कमिशनर ऑफिस में."

**कमिशनर ऑफिस-**

संतोष आणि जान्हवी बाहेर होते. संतोषला वाईट वाटू लागलं होत. आतमध्ये अर्जुन, चव्हाण, पाटील आणि कमिशनर होते

अर्जुन -" साहेब... माझा प्लॅन असा आहे की पहिला मला मरावं लागेल."

पाटील - " हे काय म्हणत आहेस?"

अर्जुन -" म्हणजे नकली मरणं ओ. त्यांना वाटेल की मी मेलो, पण नाही नंतर माझी एन्ट्री सगळी चेंज होईल."

कमिशनर -" त्यासाठी तर तुला त्यांच्या पुढे जाऊन मरावं लागेल "

अर्जुन -" ते माझ्यावर आणि संतोषदाकडे सोडा. तुम्ही फक्त एक अंबुलेन्सची व्यवस्था करा आणि हा तो हातात आला तरी तो एकदा हातून सुटेल."

a

पाटील -" हे कसं काय सांगू शकतोस तू?"

अर्जुन -" जो कॉलिंग डिटेल डिलीट करू शकतो. तो काहीही करू शकतो. त्यामुळे जरा सांभाळून."

जेंव्हा त्यांना बॉम्बची लोकेशन मिळाली. तर पहिला अर्जुन पोलिस हेड ऑफिसला गेला होता. तिथे तो बुलेट प्रुफ जॅकेट घातला आणि त्याच्या सॉस ची पाकीट ठेवला आणि वरून पांढर शर्ट घातला.

त्याला जेंव्हा गोळी लागली. तेंव्हा त्यातून सॉस निघालं आणि गुरुजीला वाटलं की तो मेला.

*****

संतोष -" वा.... अर्जुन... मानलं तुला भावा.पण बॉम्ब कसा बंद झाला

अर्जुन -" हा... तुला आठवत नाही का?...ऋचा मॅडम म्हणाली होती की हे बॉम्ब फक्त मेन लाईटनी चालतो. मग आम्ही या ठिकाणची लाईट

घालवली. म्हणजे बॉम्ब बंद झाला. ऋचा मॅडम यासाठीच असा बॉम्ब असा बनवलेले होता. "

हे ऐकून संतोष गुरुजीला म्हणाला.

संतोष -" तेरा तो खेळ खलास गुरुजी.."

गुरुजी अहंकारमध्ये म्हणाला.

गुरुजी -" लेकीन खलास करेगा कोन?. ये लडका, या ये कुत्ता..."

अर्जुन एक स्माइल देत म्हणाला.

अर्जुन -" वो लोग जिनसे तुम जैसे लोग डरते है."

एवढ्यात इस्माईलच्या डोक्यावर गोळी लागते आणि तो क्षणात खाली पडतो. बाकीच्या त्यांच्या लोकांवर ही गोळी चालते आणि ते ही मरतात. अर्जुनच्या मागून मोठी बंदुके घेऊन आर्मीचे लोक पुढे येत होते. पुढे येताच क्षणात त्यांचे लोक मेले.

a

अर्जुनने उरलेल्या लोकांचे बांधलेले हात सोडवला. सैनिक असलेले\ लोकांचे हे मिशन तर डाव्या हाथेचा मळ होता. अर्जुन त्यांनाच सगळी माहिती देऊन बोलवला होता. जान्हवी सुटताच बॉम्ब कडे गेली आणि तो व्हायरस काढून घेतला आणि आर्मी कडे बाकीचं बॉम्ब सोपवला. जवान गुरुजीला घेऊन बाहेर जाऊ लागले. जाताना तो अर्जुनला पाहिला आणि म्हणाला.

गुरुजी -" तुझे मै बाहेर आके देख लुंगा."

अर्जुन -" चल झूठा..."

अर्जुनाच्या मनात आता समाधानाची भावना दिसत होती. शेवटी त्याने तिच्या राधाच्या खूनाचा बदला घेतला होता. त्याला मनातून खूप समाधान वाटत होतं. तो त्याच्या आणि तिच्या मानलेल्या बहिणीच्या आठवणीत रमला. संतोष, स्नेहा आणि पाटील यांचा जीव सुद्धा त्याने वाचवलेला होता.

a

दुसऱ्या दिवशी ‘ ***<u>पूर्ण महाराष्ट्राला वाचणारा मुलगा</u>*** ’ असा उल्लेख अर्जुनचा केलेला होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीही त्याचे गुणगान गात होते. महाराष्ट्रातच नाही तर पूर्ण भारतात तो प्रसिद्ध झालेला होता. हे बघून ऋचाला ही बर वाटलं. अर्जुन आता फक्त अर्जुन नाही तर राजार्जुन झालेला होता.

**<u>काही दिवसानी –</u>**

पाटीलच्या कॅबिनमध्ये अर्जुन पाटील सोबत गप्पा मारत होता. इतक्यात पोलिस स्टेशनच्या बाहेर आर्मीची गाडी येऊन थांबली. त्यातून काही जवान बाहेर पडले आणि स्टेशनच्या आत गेले. त्यातले दोन जवान पाटीलच्या कॅबिनमध्ये शिरले.

जवान –“ अर्जुन??”

अर्जुन मागे वळून पाहिला.

अर्जुन – “ हा..”

जवान –“ हमे तुम्हारी जरूरत है..”

अर्जुनच्या चेहऱ्यावर प्रश्न दिसू लागले. तो राजाकडे पाहिला आणि म्हणाला,

अर्जुन – “ राजा..”

राजा भुंकला.

अर्जुन – “ चल..”

---------------------------------------------------------

***ऋषिकेश मठपती***

या पुस्तकाचा दूसरा पर्व वाचायला आवडेल का? नक्की कळवा.

फोन नंबर - 7972076796
ईमेल - mathapati278@gmail.com
इनस्टाग्राम - @rushi.278
पत्ता - १७/२ कल्याण नगर भाग -१, जुळे सोलापूर, सोलापूर (413003)